अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. ६ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३०८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## टीम इंडिया पराभवाचा वचपा काढणार? आज दुसरा टी-२० सामना

**नवी दिल्ली** : भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील टी२० मालिकेतील दुसरा सामना ६ ऑगस्ट रोजी खेळवला जाईल. या सामन्यात दोन्ही संघांमधील सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता प्रॉव्हिडन्स स्टेडियम, गयाना येथे होणार आहे.

टी२० मालिकेतील पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजने भारतावर ४ धावांनी रोमहर्षक विजय मिळवला होता. चला तर मग जाणून घेऊया दुसऱ्या टी२० मध्ये दोन्ही संघांचे प्लेइंग ११ कसे असू शकतात. विशेष म्हणजे भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील टी२० मालिकेतील पहिला सामना ३ ऑगस्ट रोजी खेळला गेला होता. या सामन्यात यजमान संघ वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यादरम्यान संघाने प्रथम फलंदाजी करताना भारतासमोर १५० धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली आणि या सामन्यात संघाचा पराभव झाला. एकदिवसीय मालिकेतून भारताला खूप सकारात्मक गोष्टी शिकायला मिळाल्या आणि सर्वात मोठी म्हणजे इशान किशनची कामगिरी. यष्टीरक्षक फलंदाजाने सलग चार अर्धशतके झळकावली पण टी२० मालिकेतील पहिल्या सामन्यात इशानला फलंदाजीत कमाल दाखवता आली नाही. आता दुसऱ्या टी२०मध्ये या फलंदाजाकडून मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. भारतासाठी आणखी एक सकारात्मक बाब म्हणजे मुकेश कुमारचा फॉर्ममध्ये आहे. या वेगवान गोलंदाजाने एकदिवसीय मालिकेत चार विकेट्स घेतल्या.

# दार तोडून दोघा शेतकऱ्यांच्या घरात घुसले; शस्त्राने हल्ला करत ५ लाखांचे दागिने लुटले

## अरण येथे दरोडेखोरांचा सशस्त्र धुमाकूळ; मारहाणीत एक शेतकरी जखमी

सुराज्य/टेंभूर्णी

**माढा तालुक्यातील अरण येथे एका शेतकऱ्याच्या घराचा बंद दरवाजा तोडून तर दुसऱ्या एका शेतकऱ्याचे खिडकीचे ग्रील उचकटून सशस्त्र दरोडेखोरांनी तलवारीने हल्ला करीत रोख रकमेसह ५ लाख १० हजार रुपये किमतीचे दागिने लुटून पोबारा केला. दरोडेखोरांच्या हल्ल्यात ६९ वर्षीय एक शेतकरी जखमी झाले. शुक्रवारी मध्यरात्री हा थरार घडला.दरोडेखोरांचा धुमाकूळ सुरू झाल्याने या भागात भीतीचे वातावरण पसरले आहे.**



जखमी शेतकरी



यासंदर्भात मिळालेली माहिती अशी, अरण (ता.माढा) येथे उत्तमराव नामदेव सावंत -पाटील हे शेतकरी राहण्यास आहेत. गुरुवारी रात्री नेहमीप्रमाणे ते जेवण करून आपल्या खोलीत झोपले होते. पहाटे २ वाजेच्या सुमारास सशस्त्र दरोडेखोरांनी ग्रीलचा दरवाजा उघडून अंगणात प्रवेश केला. त्यानंतर किचनचा दरवाजा तोडून घरात ते घरात घुसले आणि सर्वांच्या खोल्यांना बाहेरून कोंड्या लावल्या. एका खोलीत प्रवेश करून कपाट फोडून त्यातील ५० हजार रुपये घेतले. त्यानंतर हॉलमध्ये प्रवेश केला. त्या ठिकाणी उत्तमराव यांची पत्नी प्रतिभा या झोपल्या होत्या. त्यांना सत्तूरचा धाक दाखवीत एकाने हाताने मारहाण करीत यांच्या अंगावरील ३९ ग्रॅम सोन्याचे दागिने काढून घेतले. हा प्रकार चालू असताना उत्तमराव आणि त्यांचे मुले जागे झाले. मात्र त्यांना बाहेर जाता येत नव्हते. आरडाओरडा केल्यानंतर दरोडेखोरांनी तेथून पळ काढला.

हा प्रकार घडल्यानंतर दरोडेखोरांनी दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या रामचंद्र रणदिवे यांच्या घरावर चाल केली. त्या ठिकाणी दरोडेखोरांनी रणदिवे यांच्या घराचे खिडकीचे ग्रील उचकटून दरवाजा उघडला. आणि घरात घुसून करून रामचंद्र रणदिवे यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने हल्ला करीत कपाटातील १ लाख ७५ हजार रुपये रोख घेतले त्यानंतर रणदिवे यांच्या गळ्यातील ३० ग्रॅम सोन्याची चैन ओढून घेण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा जखमी रणदिवे यांनी प्रतिकार करीत एकास तीक्ष्ण शस्त्राने पलटवार केला. त्यात एक दरोडेखोर जखमी झाला. रक्तबंबाळ अवस्थेत असलेल्या रणदिवे यांच्या गळ्यातील चैन लुटून जखमी दरोडेखोराने तेथून पोबारा केला.

या घटनेची फिर्याद उत्तमराव सावंत- पाटील यांनी टेंभुर्णी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास फौजदार चंदनशिवे करीत आहेत.

दरोड्याच्या या धाडसी घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी लवकरात लवकर चोरीचा तपास लावून चोरट्यांना अटक करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.तर नव्यानेच पूर्ण पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारलेले पोलीस निरीक्षक यांच्यापुढे आरोपींना पकडण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

### दरोडेखोर मराठी भाषेतून बोलत होते

उत्तमराव सावंत-पाटील यांच्या घरावर प्रथम दरोडा पडला. यावेळी त्यांनी आरडाओरड केली. बाहेरून कोंड्या लावल्यामुळे त्यांना आणि त्यांच्या मुलांना काहीच करता आले नाही. अखेर त्यांचा आवाज ऐकून आजूबाजूच्या लोकांनी घेऊन त्यांची सुटका केली.याच्यानंतर दरोडेखोराने रामचंद्र रणदिवे यांच्या घरावर चाल केली होती. घरात घुसलेले दरोडेखोर तोंडाला कापड बांधले होते. आणि मराठी भाषेतून बोलत होते, असे यावेळी सांगण्यात आले.

### जखमी देखील पसार झाला

रणदिवे यांनी प्रतिकार करताना एक दरोडेखोर जखमी झाला होता. तो देखील हा प्रकार घडल्यानंतर इतर दरोडेखोरांसोबत पसार झाला.

## ...तर संभाजी भिडेंवर का गुन्हा दखल होत नाही

### राजू शेट्टी यांचा सवाल

**पंढरपूर** : राहुल गांधी यांच्या खासदारकी रद्द करण्यावरून हायकोर्टच्या कार्यपद्धती बद्दल लोकांच्या मनात संशय निर्माण झाला आहे. जर मोदींना चोर म्हंटल्यावर राहुल गांधींवर गुन्हा दाखल होतो तर मनोहर भिडेंवर का गुन्हा दखल होत नाही, असा प्रश्न माजी खासदार राजू शेट्टी यांनी उपस्थित केला आहे.



विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी राजू शेट्टी शनिवारी पंढरपूर येथे आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी रविकांत तुपकरांविषयी भूमिका मांडली. रविकांत तुपकर यांनी माध्यमांसमोर न बोलता ८ ऑगस्टला शिस्त पालन समितीची बैठक बोलावली आहे. या बैठकीमध्ये तुपकरांनी बोलावे. त्यांच्या शंकेचे निरसन करावे. 'स्वाभिमानी' हायजॅक करणे इतकं सोपं नाही, अशा शब्दात त्यांना फटकारले. दोन दिवसांपूर्वी तुपकरांनी पक्षाच्या बैठकीत नाराजी व्यक्त केली होती. संघटना ही कुणाची खासगी मालमत्ता नाही, संघटना कार्यकर्त्यांच्या ताकदीवर उभी राहिली, त्यामुळे संघटना सगळ्या कार्यकर्त्यांची आहे. कार्यकर्त्यांच्या बळावर मी कुणाशीही खेटायला तयार आहे, असा इशारा तुपकरांनी दिला होता. त्यावर राजू शेट्टी यांनी 'स्वाभिमानी' हायजॅक करणे इतकं सोपं नाही, अशा शब्दात त्यांना फटकारले.

**तिसरी आघाडी करणार**

एनडीए अथवा इंडिया मध्ये सहभागी न होता. इतर पक्षांची तिसरी आघाडी तयार करून लढणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. त्यामुळे शेट्टी यांनी एनडीए आणि इंडिया पासून अंतर राखले आहे.

## काँग्रेसची लोकसभेची तयारी सुरू

## पुणे आणि मावळची जबाबदारी आ.प्रणिती शिंदेंकडे

### सोलापूरसाठी बसवराज पाटील मुख्य निरीक्षक

सुराज्य/सोलापूर

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि काँग्रेसने जोरदार तयारी केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपानंतर आता काँग्रेसनेही प्रत्येक लोकसभा मतदारसंघासाठी मुख्य निरीक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. शहर मध्यच्या आ. प्रणिती शिंदे यांच्याकडे मावळ आणि पुणे लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे.

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनियाजी गांधी, राहुल गांधी, अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या शिफ़ारसींनुसार प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्य निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या आहेत. सोलापूर राखीव लोकसभा मतदारसंघासाठी मुख्य निरीक्षक म्हणून आ. बसवराज पाटील यांची तर माढा लोकसभेसाठी हुसेन दलवाई यांची मुख्य निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. आमदार प्रणितीताई शिंदे यांची पुणे लोकसभा मतदारसंघ आणि मावळ लोकसभा मतदारसंघाकारिता मुख्य निरीक्षक म्हणून महत्वपूर्ण जबाबदारी देण्यात आली. सध्या राज्यात महाआघाडी आहे. या तिघांनी एकत्रित निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. असे असले तरी काँग्रेसने राज्यातील सर्व म्हणजे ४८ लोकसभेच्या जागांसाठी मुख्य निरीक्षक नेमले आहेत.



## अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणूक; शहरातील वाहतूक मार्गात बदल

**सोलापूर** : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीची सांगता मिरवणूक रविवारी काढण्यात येणार आहे. यामुळे शहरातील वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहे. यात रेल्वे स्टेशन कडून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जायचे असल्यास नागरिकांना सातरस्ता-रंगभवन चौक-विजापूर वेस मार्गे जावे लागणार आहे.

वाहनांमुळे मिरवणुकीतील लोकांना वाहतुकीस अडथळा व गैरसोय होऊन, अपघात होऊ नये यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहे. याबाबत पोलीस आयुक्त राजेंद्र माने आदेश काढले आहेत. मिरवणुकीला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून सुरुवात होणार असून पुढे रामलाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चार हुतात्मा पुतळा चौक, सरस्वती चौक, नवीवेस चौकी समोरमार्गे छ. शिवाजी महाराज चौक या मार्गावर होणार आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहनांना व ज्या वाहनास परवानगी असेल अशा वाहनांना या मार्गावर येण्यासाठी परवानगी असणार आहे.

## प्रतापनगर येथे आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : विजापूर रोडवरील प्रताप नगरात एका ४० वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला . ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. मिथुन तुकाराम जाधव (वय ४० रा.प्रताप नगर) असे जखमीचे नाव आहे. त्याला बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . मिथुन जाधव याने आज सकाळी ९ वाजता घरातील छताच्या पंख्याला दोरीने फास घेतला होता. नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

## चोरीप्रकरणी अल्पवयीन मुलगा पोलिसांच्या ताब्यात

### सहा गुन्हे उघडकीस; पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर** : चोरी केल्याप्रकरणी एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. या प्रकरणी डीबी पथकाचे पोसई विक्रम रजपूत व त्यांचे पथकाकडून आरोपीचा शोध घेत असताना गुन्हे प्रकटीकरण पथकातील सुहास अर्जुन यांना मिळालेल्या माहितीवरून त्यांनी त्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले.




त्याची विचारपूस केल्यानंतर त्याने शहरातील तीन पोलीस ठाणे हद्दीत चोरी केल्याचे कबूल केले. यात एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील ३, फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील १, जोडभावी पोलीस ठाणे हद्दीतील २ असे एकूण सहा गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहे. यात बेवारस दुचाकीसह ३ दुचाकी, २ बॅटऱ्या व रोख ५० हजार रुपयांसह ३० ग्राम सोन्यासह २ लाख ७७ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजन माने, शिवशंकर बोंदर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई विक्रम रजपूत, चेतन रुपनर, एकनाथ उबाळे, सचिन भांगे, मंगेश गायकवाड, अमसिध्द निंबाळ, शैलेश स्वामी, काशीनाथ वाघे, शंकर याळगी, सुहास अर्जुन, सुरज पवार, अमोल यादव, देविदास कदम, कांबळे आदींनी केली.

## मध काढण्यावरून वाद; महिलेस लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर** : मध काढण्यावरून वाद होऊन एका महिलेस तिघा जणांनी मिळून लोखंडी रॉड आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. ही घटना कुर्डूवाडी येथील भांबुरेवस्ती येथे नुकतीच घडली.

अंजली अमोल शिंदे (वय ३७ रा.कुर्डूवाडी) असे जखमी महिलेचे नाव आहे. ३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी झाडावरील मध काढण्यावरून वाद झाल्याने त्यांना प्रताप ऊर्फ बबलू काळे, सविता काळे इतर एक या तिघांनी मिळून मारहाण केली. त्यांना कुर्डूवाडी येथील सरकारी दवाखान्यात प्रथम उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पती अमोल शिंदे यांनी शनिवारी दाखल केले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुला वाटतं तेवढं सोपं नाही!!!

कल्याण
778-26-259


# विध्वंसक हल्ल्याचा कट; देशभर हायअलर्ट

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**पुण्यात काही दिवसांपूर्वी अटक केलेल्या चार दहशतवाद्यांची कसून चौकशी केल्यानंतर या चौघांनी येत्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी देशात घातपात घडवण्याचा कट रचल्याची माहिती उजेडात आली. त्यामुळे दहशतवाद प्रतिबंधक पथक (एटीएस) आणि राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) यांनी देशातील काही महत्त्वाच्या शहरांना 'हाय अलर्ट' दिला आहे. त्या चार दहशतवाद्यांना शनिवारी पुण्याच्या कोर्टात हजर केल्यानंतर एटीएसकडून धक्कादायक माहिती दिली गेली. या दहशतवाद्यांची बॉम्ब बनवणारी लॅब असल्याचेही तपासात उघड झाल्यानंतर तपास यंत्रणांनी संशय असलेल्या शहरांमध्ये धाडसत्र हाती घेतले आहे.**

## इसिस-अल सुफाचे कारस्थान; चौघांकडे बॉम्ब बनवण्याची लॅब सापडली

दहशतवादी संघटना अल सुफा आणि आयसीसशी संबंधित अनेकांना गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रातून अटक करण्यात आलीय. या दहशतवाद्यांची महाराष्ट्र एटीएसने कसून चौकशी केली असता त्यांचा १५ ऑगस्टला देशात दहशतवादी कारवायांचा मोठा प्लॅन असल्याचे उघड झाले आहे. मोहम्मद युनूस साकी, मोहम्मद इम्रान युनूस खान, झुल्फिकार बरोडावाला, शाहनवाज आलम अशी या दहशतवाद्यांनी नावे आहेत.



इसिस आणि अल सुफा सारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित कोल्हापूर, रत्नागिरी आणि पुणे येथून पाच जणांना अटक करण्यात आली आहे. कोल्हापूर आणि पुण्याजवळ दहशतवाद्यांनी ट्रेनिंग केले. निपाणी, संकेश्वरमध्ये मुक्काम केला. आंबोलीमध्ये बॉम्बचे प्रशिक्षण सुरू असल्याचे समोर आले होते. अल-सुफा ही दहशतवादी संघटना मध्यप्रदेशातील रतलाम जिल्ह्यात स्थापन झाली होती. राजस्थानच्या तरुणांना कट्टरपंथी बनवण्यासाठी इंटरनेटचा वापर करत असल्याचे आढळून आले. या संघटनेचे मुख्य लक्ष्य आरएसएसचे सदस्य आणि भाजप नेते असल्याचे तपासात समोर आले आहे. एक दशकापूर्वी अल सुफा संघटना प्रकाशात आल्यानंतर त्यावर केंद्र सरकारने बंदी घातली होती.

### देशात हायअलर्ट जारी

मध्यप्रदेशातून येऊन पुण्यात तळ ठोकून कोकणात प्रशिक्षण घेऊन १५ ऑगस्टला घातपात घडवण्याच्या प्रयत्नात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्यामुळे गुप्तचर यंत्रणांनी मुंबई, दिल्लीसह देशातील महत्त्वाच्या शहरांना सावधानतेचा इशारा दिला आहे. भारतात मोठा विध्वंसक हल्ला घडवण्यासाठी माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाली आहे. त्यावरून हाय अलर्ट देण्यात आला आहे.

### अकीब नाचन कोण आहे?

अकीब नाचन याला गुजरात सरकारने २०२२ मध्ये ताब्यात घेतले होते. इसिसच्या काही संस्था आहेत त्यातील अल सुफा या संघटनेशी त्याचा संबंध होता. त्यानंतर २०२३ मध्ये त्याची सुटका करण्यात आली होती. त्यानंतर त्याने झुल्फिकार अली बरोडावाला आणि जुबेर खान यांना राहण्यासाठी भाड्याने फ्लॅट दिला होता आणि दोघांना आर्थिक मदतही केली होती.



## महिला सक्षमीकरणांवर उ. तालुक्यात कार्यशाळा

**सोलापूर** : जागर स्त्री शक्तीचा स्वयंशिक्षण प्रयोग संस्थेकडून ३ ऑगस्ट रोजी होनसळ, करंबा, नान्नज, अकोलेकाटी, गुळवंची, डोणगाव येथे महिला सक्षमीकरण कार्यशाळा संपन्न झाली. या बैठकीमध्ये शेख जाफर प्रकल्पच्या सर्व उपक्रमाची माहिती दिली. शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत आणि सिबिल म्हणजे आय ई. विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी बद्दल प्रकल्प मॅनेजर अनुराधा होवाळ यांनी सविस्तर चर्चा केली. महिलांनी व्यवसाय मध्ये येण्याचा कल वाढवा या दृष्टीने ही बैठक घेण्यात आली. बैठकीचे नियोजन तालुका समन्वयक सावित्री पाटील यांनी केले.

## जॉन येवलेकर राज्यस्तरीय उत्कृष्ट निवेदक पुरस्कार जाहीर

**सोलापूर** : सोलापूरचे सुपुत्र हरहुन्नरी कलाकार आणि निवेदक स्वर्गिय जॉन येवलेकर यांच्या जन्मदिवसानिमित्त जॉन येवलेकर राज्यस्तरीय उत्कृष्ट निवेदक पुरस्कार यंदा मुंबईचे विघ्नेश जोशी, सोलापूरच्या मंजुषा गाडगीळ आणि शीला अडसूळे - कांबळे यांना जाहिर करण्यात आला आहे, अशी माहिती सर जॉन येवलेकर प्रतिष्ठानच्या सचिवा रूपश्री येवलेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदाच्या वर्षी नाट्य, चित्रपट अभिनेता, लेखक आणि निवेदक विनेश जोशी, निवेदिका मंजुषा गाडगीळ आणि निवेदिका शीला अडसुळे यांना हा पुरस्कार जाहिर करण्यात आला असून ज्येष्ठ नाट्य आणि चित्रपट अभिनेते महाराष्ट्र रंगभूमी परिनिरीक्षण अध्यक्ष विजय गोखले यांच्या हस्ते सोमवार दि. ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल बालाजी सरोवर येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या कार्यक्रमाला दि फर्स्ट चर्च सोलापूरचे धर्मगुरू रेव्ह. विकास रणशिंगे, एचसीसी चर्च सोलापूरचे धर्मगुरु रेव्ह. इमॅनुएल म्हेत्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ११ हजार रुपये रोख, सन्मान चिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे, असेही रूपश्री येवलेकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला जॉन येवलेकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष फिलीप नदवी, उपाध्यक्ष शशिकुमार तेलंग, सहसचिव मंजुश्री येवलेकर, खजिनदार तेजश्री येवलेकर, सदस्य किरणकुमार इरनाळे, मायकल नदवी आदी उपस्थित होते.

## कुमारस्वामीजी जीवन कार्य ग्रंथाचे १५ रोजी प्रकाशन

**सोलापूर** : राजेंद्र मायनाळ लिखित 'महातपस्वी श्री कुमारस्वामीजी जीवन व कार्य' या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन सोहळा प. पू. महा तपस्वी श्री कुमारस्वामी योग विहार इंदिरानगर, पोस्ट ऑफिस जवळ विजापूर रोड येथे होणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते आणि अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अधिष्ठाता डॉ. माधवी रायते यांच्या अध्यक्षतेखाली तर माजी आमदार विश्वनाथ चाकोते, जेष्ठ विधीज्ञ ॲड. किरण कनाळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच सोमवार ७ ते १३ ऑगस्ट दरम्यान महातपस्वी श्री कुमारस्वामीजींच्या ११४ व्या जयंती महोत्सवानिमित्त सोमवार ७ ते रविवार १३ ऑगस्ट दरम्यान दररोज सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत ग्रंथ प्रकाशन व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार १५ ऑगस्ट रोजी प. पू. श्री कुमारस्वामीजींचा जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. रक्तदानाने व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटक म्हणून डॉ. संदीप होळकर हे उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष नीलकंठप्पा कोनापुरे, कार्यवाह बाबासाहेब कुलकर्णी, विश्वस्त नागनाथ चौगुले आदी उपस्थित होते.

## रंग साधक पुरस्काराचे होणार आज वितरण


**सोलापूर** : येथील अस्तित्व मेकर फाउंडेशन आयोजित रंगसाधक प्रमोद खांडेकर करंडक राज्यस्तरीय लघुनाटिका (हास्य प्रहसिका) २०२३ या स्पर्धे रविवारी सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्य संयोजक ॲड. बसवराज सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धेचे उद्घाटन या महोत्सवाचे यंदाचे अध्यक्ष शशिकांत पाटील तसेच विजयकुमार साळुंके, गुरुनाथ वठारे, सुमित फुलमामडी, राजा बागवान यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी रंग साधक पुरस्कार मुंबईच्या ज्येष्ठ रंगकर्मी रसिका अगाशे यांना देऊन गौरविण्यात येणार हे. या पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ रंगकर्मी शशिकांत लावणीस, ड.मिलिंद थोबडे, प्रा. डॉ.गौतम कांबळे, अमित कलगुंटकर, डॉ. केदारनाथ काळवणे,प्रा.डॉ.मधुकर पवार ,अमित रोडगे, डॉ.कौस्तुभ तांबेकर आदींच्या हस्ते होणार आहे. या पत्रकार परिषदेस शशिकांत पाटील, किरण लोंढे ड. सागर देवकुळे, केदार देशमुख आदी उपस्थित होते.

## अधिक मासानिमित्त गोटेवाडीत सत्संग

**सोलापूर** : मोहोळ तालुक्यातील गोटेवाडी येथील अध्यात्म कुटींत अधिक मासानिमित्त सत्संग सोहळा पार पडला.आपले सद्‌गुरू श्री.स.स.गणपतराव महाराज,कन्नूर यांच्या जन्म तिथीस म्हणजे प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या चतुर्थीस या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. श्रीकृष्ण दादा संपगावकर, (शांतीकुटीर आश्रम कन्नूर) यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी सत्संगाचे महत्त्व व सत्संग का करावा या बद्दल मार्गदर्शन केले. सत्संगती आणि गुरुभक्ती या विषयावर विवेचन त्यांनी केले व त्यानंतर दासबोध व सुलभ आत्मज्ञान वाचन झाले. सत्संगाचे महत्व श्रीकृष्ण दादांनी पटवून दिले.

भारतीय सुराज्य संस्था शाखा गोटेवाडीचे कार्यकर्ते, सुमारे ५०० विद्यार्थी व शिक्षक वर्ग उपस्थित होते.गोटेवाडी येथून निरोप घेवुन सोलापुर येथे अमोल तुम्मा यांच्या स्वगृही सत्संग झाला. त्यांच्याकडे दासबोध व सुलभ आत्मज्ञान या ग्रंथाचे वाचन झाले. त्यावर व श्रीकृष्ण दादांनी निरुपण केले.भजन, आरती व प्रसादाने सांगता झाली.

## जैबून्नीस्सा सय्यद यांचे निधन



**सोलापूर** : श्र रविवार पेठ येथील जैबून्नीस्सा अब्दुल बशीर सय्यद ( वय ७३) यांचे शनिवारी दुपारी दीडच्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, तीन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर जडेसाब कब्रस्तानात अंत्यसंस्कार करण्यात आले. वालचंद महाविद्यालयाचे स्टेनो अब्रार सय्यद यांच्या त्या मातोश्री होत.

# विश्वशांतीसाठी मूल्याधिष्ठित शिक्षण महत्वाचे : उल्हास पवार

### माईस एमआयटीचा ४१ वा वर्धापन दिवस उत्साहात साजरा

सुराज्य/पुणे

**शिक्षणाचा बहुअंगाने विकास होत असतांना माईर्स एमआयटी संस्थेने ज्ञान,विज्ञान, अध्यात्म, संस्कृती व मानवता हा मुळ गाभा सोडलेला नाही. विश्वशांतीसाठी मूल्याधिष्ठित शिक्षण देऊन येथे नवी पिढी निर्माण केली जात आहे. असे विचार ज्येष्ठ नेते व माजी आमदार उल्हास पवार यांनी विचार व्यक्त केले.**




माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेचा ४१ वा स्थापना दिवस शनिवारी कोथरूड कॅम्पस मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या प्रसंगी प्रियदर्शनी ॲकॅडमीचे माजी अध्यक्ष नानीक रुपानी व ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, व्यवस्थाकिय समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश तु. कराड उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटीचे संस्थापक व मुख्य संयोजक व युनिस्को चेअर व्होल्डर विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड होते.या प्रसंगी डॉ. विश्वनाथ कराड यांना संत तुकाराम महाराज यांची पगडी घालून विशेष सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रीय विधायक परिषद यशस्वी केल्यामुळे राहुल विश्वनाथ कराड यांचाही सत्कार करण्यात आला. उल्हास पवार म्हणाले, डॉ. कराड यांनी लावलेले बीज आज वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. या संस्थेचे पाच विद्यापीठांच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य सुरू आहे. संत ज्ञानेश्वर व जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या नावाने जगातील सर्वात मोठ्या घुमटाची निर्मिती करून विश्व शांतीचा संदेश पोहचविण्याचे कार्य सुरू आहे. सध्या राहुल कराड यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात संस्था प्रगतीच्या शिखरावर असून संस्थेचा आलेख प्रगतीपथावर आहे.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, आजचा दिवस आंतरिक समाधानाचा व जीवनातील वेगळी अनुभूती देणारा दिवस आहे. ४१ वर्षापूर्वी केलेल्या संकल्पाला दिशा मिळाली. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला वसंतदादा यांच्यामुळे नवी दिशा मिळाली. ही संस्था ज्ञान विज्ञानाची प्रयोगशाळा आहे.

डॉ. मंगेश तु. कराड म्हणाले, भारतीय शिक्षण क्षेत्रात देशभरता वेगळी ओळख निर्माण करणारी माईर्स संस्था एक विचारधारा घेऊन वाटचाल करीत आहे. त्याग, प्रयत्न आणि कष्टाच्या जोरावर डॉ.कराड यांच्या मार्गदर्शनात संस्था प्रगतीपथावर आहे. जागतिकरणाच्या वाटेवरील या विद्यापीठाला काळानुसार बदलणे गरजेचे आहे. राहुल कराड म्हणाले, आजचा दिवस उर्जा देणार आहे. सर्वांनी संकल्प करून शिक्षण क्षेत्रात अद्वितीय कार्य करण्यास सज्ज व्हावे. राष्ट्रीय विधायक परिषदेचे आयोजन करून संस्थेच्या माध्यमातून नव्या कार्याची सुरूवात झाली आहे.

मधुकर भावे व नानीक रूपानी यांनी सांगितले की, ही संस्था गुणवत्तेचा शोध घेण्याचे कार्य करीत आहे. संस्थेला अध्यात्माची ताकद मिळाली आहे. वर्तमान काळात पर्यावरणाचा ऱ्हास होतांना दिसत आहे. त्यामुळे उद्याच्या पिढीचा नाश नक्कीच आहे. या प्रसंगी अधिष्ठात प्रा.शरदचंद्र दराडे पाटील, पं.वसंतराव गाडगीळ, एमआयटी डॉ. आर.एम.चिटणीस, प्र. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, सर्व विभागचे अधिष्ठाता व संचालक, शिक्षक उपस्थित होते. प्रा.डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस यांनी आभार मानले.

## शेती पंपाच्या मोटारी चोरणारी टोळी पकडली

### दोघांना अटक; दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/मोहोळ



मोहोळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने शेती पंपाची मोटर चोरी उघड केली असून दोन आरोपींना अटक करत सुमारे दीड लाखांचा मुद्देमाल त्यांच्या कडून जप्त केला आहे. इतर दोन आरोपी फरार आहेत.

मोहोळ परिसरामध्ये शेतकऱ्यांच्या पाण्याच्या पंपाच्या मोटारी सुरू जाण्याचे प्रमाण वाढले होते. याचस तपास करत असताना रेकॉर्ड वरील गुन्हेगारही चेक करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून होत होता. पोलिसांना या प्रकरणात दोन नावे कळाली. त्यांनी त्यांच्यावर पाळत ठेवूत त्यांना ताब्यात घेतले. मोटर पंपाची चोरी याच दोघांनी केल्याचे निष्पन्न झाले. इतर दोन इसमांना ताब्यात घेऊन चौकशी करून त्यांना विश्वासात घेऊन चौकशी केली. यात सानिष उर्फ रोहित सहदेव अष्टूळ, ऋषी गोडसे, अक्षय अष्टूळ (रा. तिघे नागनाथ गल्ली मोहोळ) तर प्रमोद विनोद जाधव (रा. दत्तनगर मोहोळ) या चौघांना मोहोळ पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली त्यांच्याकडून एक लाख ४५ हजारांचा माल जप्त केला. ही कामगिरी मोहोळ पोलीस ठाण्याची पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स.ई. खारगे, पो.कॉ. सचिन माने, अमोल घोळवे, प्रवीण साठे सिद्धनाथ मोरे, संदीप सावंत, अजित मिसाळ, सागर भोई यांनी केली.

## जानकर यांनी संत बाळूमामा पालखीचे घेतले दर्शन

सुराज्य/वेळापूर



वेळापूर ता. माळशिरस येथे गेल्या पाच दिवसापासून संत बाळूमामा यांची पालखी ( बग्गा क्र.०१) मुक्कामी आहे. वेळापूर येथे पालखीचे प्रमुख सुरेश कारभारी व त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने दररोज प्रवचन व महाप्रसादाचे आयोजन केले जात आहे.

शुक्रवारी निरोपाच्या दिवशी जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व अकलूज मार्केट कमिटीचे संचालक उत्तमराव जानकर यांना बाळूमामाच्या आरतीसाठी प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित केले होते. यावेळी उत्तमराव जानकर यांनी संत बाळुमामा यांच्या पादुकांचे दर्शन घेतले. उत्तमराव जानकर यांच्या हस्ते संत बाळूमामांची महाआरती घेण्यात आली. या कार्यक्रमास वेळापूर गावचे सरपंच रजनीश बनसोडे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादाराजे घाडगे, संजय देशपांडे, विनायक माने, अमोल पनासे उपस्थित होते.

## वडापूरच्या सरपंचपदाचा पदभार सविता वाघचवरे यांच्याकडे

सुराज्य/ सोलापूर



दक्षिण सोलापूरातील वडापुर गावचे सरपंच राजेश्री कोळी यांनी राजिनमा दिल्यामुळे आहे. त्यामुळे कोळी यांचा पदभार उपसरपंच सविता कोळी यांच्या दिला आहे. तसे पत्र तलाठी प्रविणकुमार घोडके यांनी वाघचवरे यांना दिले आहे.

राजेश्री कोळी यांचा जातीचा दाखला बनावट असल्याने कोळी यांचे सदस्य जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द केले आहे. त्यामुळे दोन महिन्यापुर्वी कोळी यांनी सरपंचपदाचा राजीनामा दिला होता. आता या पदाचा पदभार उपसरपंच सविता वाघचवरे यांच्याकडे देण्यात आला. पदभार घेतल्यानंतर वाघचवरे यांचा वडापुर ग्रामस्ताच्या वतीने सत्कार करण्यात आला. सदस्य सुजाता पाटील बायडा कांबळे यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी गौरप्पा पुजारी, संतोष पाटील, सागर पाटील, बापू पाटील, ओम गुंड, सैरभ वाघचवरे, गजेंद्र गरड, बाळासाहेब माशाळे, सुनिल गरड, मयुर पाटील, भीमा कोळी, आप्पासाहेब पारसे उपस्थित होते.

## उत्तर तहसीलमधील संजय गांधी निराधाराची १३१२ प्रकरण निकाली

सुराज्य/ उ. सोलापूर

महसूल सप्ताह निमित्ताने ३ ऑगस्ट हा दिन एक हात मदतीचा हा कार्यक्रम शासनस्तरावर राबविण्यात आलेल्या उपक्रमात उत्तर सोलापूर तहसिल कार्यालय तील संजय गांधी निराधार योजना तालुकास्तरीय बैठकीत १३१२ प्रकरणे निकाली काढण्यात आली.


एक हात मदतीचा संकल्पनेतून विशेष साहाय्य योजनेची एकूण ८८० अर्ज मंजूर करण्यात आली आहेत त्यामध्ये विधवा लाभार्थी ४०९, दिव्यांग लाभार्थी ९२, अविवाहित लाभार्थी १९, दुर्धर आजार १३, घटस्फोटित लाभार्थी, १३ अणि ६५ वर्षावरील वयस्कर ३२४ लाभार्थी यांना लाभ दिला आहे. तर ग्रामीण भागामध्ये ३ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा हा कार्यक्रम ग्राम पातळीवरून घेण्यात आलेल्या गावनिहाय १७५ लाभार्थी (मार्डी १७, गावडी दार फळ १९, नान्नज२३ याप्रमाणे इतर ग्रामपंचायती मधिल नागरिकांना लाभ देण्यात आला प्रत्यक्षात लाभार्थी यांच्या घरी जावून तलाठी मंडळ अधिकारी यांच्यामार्फत सदर लाभाचे आदेश वितरीत करण्यात आले.कार्यक्रमास उत्तर सोलापूरचे तहसीलदार सौफन नदाफ , नायब तहसीलदार विश्वजीत गुंड, गजानन गायकवाड, मंडलाधिकारी संदीप लटके, सारिक ओव्हाळ, सुखदेव पाटील, रत्नाकर कांबळे तलाठी देवराज गायकवाड उपस्थित होते.

महसूल दिनानिमित्त सैनिक हो तुमच्यासाठी हा कार्यक्रम अंतर्गत माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे मुद्रांक विभागाचे प्रमुख गोविंद गीते, क्रमांक एकचे उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, उत्तर सोलापूरचे तहसीलदार सैफन नदाफ,भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे उपस्थित होते.

## हिळ्ळी व तडवळ भागात उसावर मावा रोग

### शेतकरी झाले चिंतातूर; उसातच सोडली जनावरे

सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट तालुक्यात गेल्या पंधरा दिवसांपासून सतत रिमझिम पाऊस होत असल्याने या पंधरादिवसात अचानक हिळ्ळी व तडवळ भागात यंदा ऊसावर मोठ्याप्रमाणात तांबा व मावा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने या भागातील शेतकरी हैराण झाला आहे.या रोगामुळे उसाची मोठ्याप्रमाणात वाढ खुंटल्याने शेतकरी कंटाळून उसातच जनावरं सोडले आहेत.

परिसरात होणाऱ्या सततच्या रिमझिम पावसामुळे आणि हवामानात झालेल्या बदलामुळे ऊसाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिळ्ळी व तडवळ भागातील शेतकरी हतबल झाला आहे.ऊसावर अचानक या पंधरा दिवसांत तांबा व मावा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने ऊसाची वाढ खुंटली आहे.या रोगाच्या प्रादुर्भाव मुळे ऊसाला कांड्याच फुटत नसल्याचे शेतकरी सांगितले जात आहे. लाखो रुपये खर्च करून, बँक कर्ज काढून कर्ज बाजारी झालेला शेतकरी सध्या उसावर पडलेल्या तांबा व मावा रोगामुळे हवालदिल झाला आहे. नगदी पिक वाया गेल्याने शेतकरी हताश होऊन उसात जनावर सोडल्याचे चित्र सध्या हिळ्ळी तडवळ भागात दिसून येत आहे.उसावर पडलेल्या तांबा व मावा रोगामुळे जनावर ही उसाचे पाचटाला तोंड लावताना दिसून येत नाहीत.तरी संबंधित तालुका कृषी अधिकारी यांनी तडवळ व हिळ्ळी भागाला भेट देऊन शेतकर्यांना मार्गदर्शन करण्याची मागणी हिळ्ळीचे सरपंच आप्पसाहेब शटगार यांनी केली आहे.

## मंगळवेढा आरोग्य कर्मचारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी जाधव

सुराज्य/लक्ष्मीदहिवडी

जिल्हा परिषद मंगळवेढा तालुका आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी सुनील जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना राज्याध्यक्ष महेश जाधव, जिल्हाध्यक्ष मिलिंद गणपुले सोलापूर जिल्हा आरोग्य कर्मचारी तांत्रिक सोसायटीचे चेअरमन प्रमोद जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड पार पडली.



यावेळी सदर संघटनेचे कार्यकारिणीमध्ये सरचिटणीस आर. आर. पाटील, उपाध्यक्ष श्रीमती तिन्हेकर, कार्याध्यक्ष प्रवीण पवार, खजिनदार भुजंग सर्जे, प्रसिद्धीप्रमुख विशाल चौगुले व विठ्ठल क्षिरसागर यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी डॉ.मोहन शेगर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बिरदेव दुधभाते, डॉ.अनिरुद्ध पिंपळे, डॉ.भाऊसाहेब जानकर, डॉ. नंदकुमार शिंदे, डॉ. डी.जी. शिंदे, रमेश माने, श्रावण मोरे, प्रमोद म्हमाने, मोहन यादव, चंद्रकांत पवार, बब्रुवान माने,प्रदीप भोसले, मनोज पाटील, पी आर पाटील, रणजीत लेंडवे, बेताळे सिस्टर, प्रल्हाद नाशिककर आदी उपस्थित होते.

## केळी संशोधन केंद्रासाठी कृषी विभागाने प्रस्ताव मागवला

### आ. रणजितसिंहांची मंत्री धनंजय मुंडे यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा

सुराज्य/अकलूज

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात केळी संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत गेली एक वर्षापासुन रणजितसिंह मोहिते पाटील करत असलेल्या प्रयत्नांना यश आले असुन आ.मोहिते पाटील यांनी विधानपरिषदेत केलेल्या मागणीनुसार कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेवुन केलेल्या पत्र व्यवहारानंतर कृषीमंत्र्यांनी तात्काळ प्रस्ताव दाखल करण्याच्या सुचना आपल्या विभागाला दिल्या आहेत.

आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विधानषरिषदेत उपस्थित केलेल्या चर्चे नंतर सोलापूर जिल्ह्यातील शेलगाव(वां) ता.करमाळा येथिल कृषी विभाग महाराष्ट्र शासन फळरोपवाटिका(गट नं.१००ते १०८)व महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत कोरडवाहू संशोधन केंद्र( गट नं.११०,१११ व ११२/३)अशा एकूण सुमारे १०० एकर जागेपैकी उपलब्ध जागेत केळी संशोधन केंद्र स्थापन करण्याची मागणी त्यांनी कृषीमंत्र्यांकडे केली होती.त्यांनी आ.मोहिते पाटील यांच्या पत्रावर दिलेल्या प्रतिसादानंतर जळगाव,नांदेड नंतर सोलापुर जिल्ह्यात केळी संशोधन केंद्र स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सोलापूर भागातील हवामान,मृदापरीक्षण,केळीच्या विविध वाणांचा संग्रह करून अभ्यास करणे,केळी लागवडीसाठी संपूर्ण तंत्रज्ञान विकसित करणे,केळींसाठी लागणा-या अन्नद्रव्यांची मात्रा ठरविणे,केळी पिंकावरील रोग व किडींचे व्यवस्थापन,शिक्षण आणि प्रशिक्षण याद्दष्टीने अभ्यास आणि उपाययोजना करण्यासाठी शेलगाव ता.करमाळा येथे केळी संशोधन केंद्र होणार असल्याने शेतकऱ्याच्या वतीने आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे आभार व्यक्त केले जात आहे.

### केंद्राची उभारणी झाले शिवाय पाठपुरावा थांबणार नाही

सोलापुर जिल्ह्यात केळीच्या क्षेत्रात वाढ होत आहे.येथील उत्पादकांना नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी वाव आहे त्यादृष्टीने केळी संशोधन केंद्र स्थापन व्हावे यासाठी गेल्या वर्षापासुन मी सातत्याने मागणी करत असुन ती पुर्णत्वाकडे जात आहे.कृषी मंत्र्यांबरोबर चर्चा झाली असुन तत्काळ प्रस्ताव मागवला आहे.प्रस्ताव मंत्रालयात आला तरी केळी संशोधन केंद्राची उभारणी झाले शिवाय माझा पाठपुरावा थांबणार नाही, असे आ. आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले.



**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकास या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डी सब डी सोलापूर ता. उत्तर सोलापूर, सोलापूर महानगरपालिककेच्या नविन हद्दवाढ मधील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं.२१८/२अ यांसी नविन सर्व्हे नं. २२ / २अ पैकी आदर्श नगर मधील बिनशेती प्लॉट नं.२२/१ यांसी पूर्व-पश्चिम ६२.४ फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे एकूण १४५.०० चौ.मी. अथवा १५६०.२ चौ. फुट इतकी असून यामध्ये आर. सी.सी बांधकामात केलेले तळमजल्याचे चार रुम, संडास बाथरुम व पहिल्या मजलाचे दोन रुम,संडास बाथरुम,बोअर, नळ कनेक्शन वगैरे घरजागेचे मिळकत यांसी चत्तुसिमा:- पुर्वेस:-रस्ता, दक्षिणेस:-प्लॉट नं. २२क, पश्चिमेस:-प्लॉट नं. ६५, उत्तरेस:-प्लॉट नं. २१ येणेप्रमाणे चतु:सिमतील मिळकत व त्यातील तद्नंभुत वस्तूसह. सदरची घरजागा ही नागेश मार्केडेय दोरनाल यांचे मालकी कब्जे वहिवाटीची असून सदर घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलास दिलेली असल्यामूळे सदरचा खरेदीखताच्या व्यवहारापोटी मोठी रक्कम साठेखतान्वये दिलेली आहे.

परंतु वर वर्णन केलेली घरजागा ही ठाणे जनता सहकारी बँक लि. शाखा - सोलापूर या बँकेचा बोजा असून याचेशिवाय कोणाचीही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दावा, लीज, टाच, बोजा, पोटगी, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, करार, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा मुदतीत ज्यांचे हक्क, हितसंबंध असेल त्यांनी त्यांचे लेखी हरकत कळवावी अन्यथा ते जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे असे समजून पुढील व्यवहार केले जाईल तसेच कोणाचेही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमुद घरजागेबाबत आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचेही कसलेही तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर व घरजागेच्या खरेदीखतावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचेही फसगत होऊ नये म्हणून सदरची खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली आहे. टीस दिली तारीख ०५/०८/२०२३

सही/-
**ॲड. अंबादास गंगाराम कंदीकोंडा,**
पिसपॅराडाईज कॉम्प्लेक्स लॉयर्स चेंबर नं. ७,
तिसरा मजला, दिवाणी न्यायालयासमोर,
सिध्देश्वर पेठ, सोलापूर मो.नं. ९३७३९५५७३०
अशिलातर्फे ॲडव्होकेट

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

# शिंगणापूर-नातेपुतेला जाणारा भवानी घाट २२ ऑगस्ट पर्यंत बंदच

✔ सुराज्य/नातेपुते

रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे दहिवडी-नातेपुते मार्गावरील शिंगणापूर घाटातील वाहतूक २४ जुलैपासून बंद आहे. सध्या घाटातील डोंगर फोडण्याचे काम प्रगतीपथावर असून २२ ऑगस्टअखेर शिंगणापूर घाटरस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती अकलूज बांधकाम विभागाने दिली आहे. दरम्यान सातारा-सोलापूर जिल्ह्यांना जोडणारा प्रमुख घाटमार्ग महिनाभर बंद असल्याने वाहनधारक, भाविक, स्थानिक प्रवाशी त्रस्त झाले असून घाटातील वाहतूक लवकर सुरू करण्याची मागणी होत आहे.

## स्थानिक वाहनधारक, भाविक त्रस्त



अहमदनगर-डाळज-कराड राज्यमार्ग अंतर्गत नातेपुते मार्गावरील शिंगणापूर भवानी घाटातील रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्हा प्रशासनाने यापूर्वीच २४ जुलै ते ७ ऑगस्ट अखेर घाटातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यास परवानगी दिलेली आहे. सध्या डोंगर फोडण्याचे ५० ते ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यातच डोंगर फोडताना दरडी कोसळून रस्त्याचे संरक्षक कठडे व भिंती ढासळल्या आहेत. तसेच दरडींचे मोठमोठे दगडाचे ढिगारे, राडारोडा रस्त्यावरच कोसळला असल्याने ते हटविण्याचे काम ही सुरू आहे. मात्र नैसर्गिक अडचणी, कड्याची उंची यामुळे कामात अडथळे येत आहेत. प्रशासनाने परवानगी दिलेल्या मुदतीत काम पूर्ण होत नसल्याने ठेकेदार कंपनीने उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी बांधकाम विभागाकडे आणखी १५ दिवसांची मुदतवाढ मागितली आहे. त्यामुळे अकलूज बांधकाम विभागाने ८ ऑगस्ट ते २२ ऑगस्टअखेर घाटातील वाहतूक बंद ठेवून वाहतूक पूर्वीप्रमाणे पर्यायी मार्गाने वळविण्यासंदर्भात सोलापूर जिल्हाधिकारी यांचेकडे परवानगी मागितली आहे. त्यामुळे शिंगणापूर घाटरस्ता २२ ऑगस्टअखेर वाहतुकिस बंद राहणार असल्याचे अकलूज बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता सुनीता पाटील यांनी सांगितले.

### अधिक-श्रावण महिन्यात भाविकांची गैरसोय

अधिक व श्रावण महिन्यात शिखर शिंगणापूर याठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. ऐन गर्दीच्या काळातच शिंगणापूर भवानी घाट वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने भाविक, स्थानिक प्रवाशी त्रस्त झाले आहेत. त्यातच नातेपुतेकडे जाण्यासाठी पर्यायी असलेल्या कोथळे-पिंपरी रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. त्यामुळे हजारो भाविकांसह स्थानिक वाहनधारकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे शिंगणापूर घाटातील वाहतूक श्रावण महिन्यापूर्वी सुरू करण्याची मागणी होत आहे.

## वन्य प्राण्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास शासनाकडून २५ लाखांची मदत

✔ सुराज्य/सोलापूर

वन्यप्राणी म्हणजेच बिबट्या, लांडगा, रानडुक्कर आदींच्या हल्ल्यात माणसाचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना २५ लाखांची मदत मिळणार आहे. यापूर्वी ही मदत १५ लाख रुपयांपर्यंत मिळत होती. शासनाने यात सुधारणा करुन नवा आदेश प्रसिद्ध केला आहे.

मागील आर्थिक तरतुदीनुसार मृत्यू, कायमस्वरुपी अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी व्यक्तीला आर्थिक मदत कमी होती. यात वाढ करण्याबाबत अनेकजणांनी मागणी केली होती. यापूर्वी माकड व वानर यांच्या हल्ल्यामध्ये जखमी व मृत झाल्यास व्यक्तीस नुकसान भरपाई देण्यात येत नव्हती. यात आता सुधारणा करण्यात आली असून माकड व वानर यांच्या हल्ल्यामध्ये जखमी व मृत झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येणार आहे.

वाघ, बिबट्या, अस्वल, गवा, रानडुक्कर, लांडगा, तरस कोल्हा, मगर, हत्ती, रानकुत्रे (ढोल), रोही (निलगाय), माकड, वानर यांच्या हल्ल्यामध्ये मनुष्य जखमी होतो. सोलापूर जिल्ह्यात बिबट्या, लांडगा, रानडुक्कर आदी प्राण्यांच्या हल्ल्यात व्यक्ती जखमी व मृत झाले आहेत.



## उत्तर तालुका फोटोग्राफर संघटनेच्या अध्यक्षपदी शिंदे

✔ **उ. सोलापूर** : बीबीदारफळ येथे फोटोग्राफर संघटनेची घेण्यात आलेल्या बैठकीत फोगोग्राफर संघटनेच्या अध्यक्षपदी दत्तात्रय शिंदे यांची निवड करण्यात आली.इतर पदाधिकारी- उपाध्यक्ष- दादासाहेब निकम ,सचिव- दयानंद कुंभार, सहसचिव- विशाल येलगुंडे ,खजिनदार- नितीन गुरव,सहखजिनदार- जीवन पवार यांची निवड करण्यात आली. यावेळी दयानंद कुंभार,सुहास वाघमारे, गणेश गवळी,नितीन गुरव, बिरुदेव भालेकर, दत्तात्रय शिंदे,अमोघसिद्ध जाधव,जीवन पवार, प्रमोद माने, विशाल येलगुंडे, दादासाहेब निकम, श्रीकांत आदाटे, दीपक सुरवसे, संतोष साठे,रवी सुपाते, अखिल मुलानी, श्याम फंड, ब्रह्मदेव शेंडगे उपस्थित होते.

## बिंजगेरी फाटा येथे कार उलटली

✔ **अक्कलकोट** : येथील गाणगापूर रोडवर बिंजगेरी फाटा येथे सोलापूर हुन गाणगापूर ला देवदर्शनासाठी निघालेल्या कारच्या चालकाचा ताबा सुटुन कार रस्त्याच्या पलीकडे जाऊन उलटली. हा अपघात शनिवारी दुपारी घडला. या यात एम एच १४ ए एम ६५८८ या कारमधील गाणगापूर कडे जाणारे भाविक जखमी झाले. सोलापूर लिमयेवाडी येथील चार पुरूष व दोन महिला गंभीर जख्मी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी सोलापूरच्या शासकिय रूग्णालयात पाठविण्यात आले. पोलीस अधिक तपास करत आहेत. रात्री उशिरा पर्यंत दक्षिण पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्याचे काम सुरू होते.

# जलसंधारण मंजूर कामांवरील स्थगिती अखेर उठली

## आ. बबनराव शिंदे यांची माहिती

✔ सुराज्य/टेंभुर्णी

माढा विधानसभा मतदारसंघातील माढा व पंढरपूर तालुक्यातील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील कामांना मे-जून,२०२२ या वर्षात १५ कोटी ३४ लाख इतक्या रक्कमेच्या कामास प्रशासकिय मान्यता मिळालेली होती. परंतू राज्यात सत्तांतर झाल्याने मंजूर कामांना स्थगिती देण्यात आली. अखेर या मंजूर कामांवरील स्थगिती शासन आदेशानुसार उठली असल्याची माहिती आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

आ.शिंदे म्हणाले की, माढा मतदारसंघातील माढा व पंढरपूर तालुक्यातील काही भाग आवर्षण प्रवण क्षेत्रात येत आहे, त्या ठिकाणी पाण्याची भीषण टंचाई आहे. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत १२ जलसंधारण कांना मे-जून, २०२२ या वर्षात



प्रशासकिय मान्यता मिळाली होती. परंतू जलसंधारणांच्या कामांना स्थगिती देण्यात आली होती. नुकतेच पुरवणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचेकडे प्रत्यक्ष भेटून पत्राव्दारे पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार माढा विधानसभा मतदारसंघातील १५ कोटी ३४ लाख इतक्या रक्कमेची जलसंधारण कामावरील स्थगिती दि.३१-०%-२०२३ रोजीच्या शासन आदेशानुसार उठली आहे. जलसंधारण कामांतर्गत रुपांतरीत साठवण तलाव, गेटेड चेक डॅम, साठवण बंधारा व इतर कामांचा समावेश आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार असल्याची माहिती आ.शिंदे यांनी दिली.

### माढा मतदारसंघातील जलसंधारणाची होणार कामे

वडाचीवाडी रुपांतरीत साठवण तलाव - रक्कम रु. ४,२८,४६,०१८ , (२) पालवण रुपांतरीत साठवण तलाव - रक्कम रु.३,५०,२१,४२३ (३)चव्हाणवाडी क्रं.१ गेटेड चेक डॅम - रक्कम रु.१,१४,१६,६७५, (४) चव्हाणवाडी क्रं.२ गेटेड चेक डॅम - रक्कम रु.१,३५,२७,२२१, (५) चव्हाणवाडी क्रं.३ गेटेड चेक डॅम - रक्कम रु.१,३०,१२,१६७, (६) चव्हाणवाडी क्रं.४ (अरुण सदाशिव चव्हाण गट नं.१३६) गेटेड चेक डॅम - रक्कम रु. ४४,८६,१९०

## पिलीव परिसरातील टपरीधारकांवर कारवाई

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव गावातील शाळा परीसरात जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधिक्षक शिरीष देशपांडे यांच्या आदेशानुसार २० पानटपऱ्यावर धाडी मारुन कारवाई करणयात आली आहे. १०० मीटर परिसरात बंदी असूनही शाळेलगत अनेक टपऱ्या होत्या. अखेर त्या जमिनदोस्त करण्यात आल्या. ही कामगिरी सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष देशपांडे,उपविभागीय अधिकारी सई भोरे- पाटील, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, यांच्या मार्गदशनाखाली पिलीव औट पोस्टचे पोलीस उपनिरीक्षक पुजारी, अभिजीत कणसे, पंडित मिसाळ, दत्ता खरात, अमित जाधव, सतिश धुमाळ यांनी केली.



## कोन्हाळी येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वृक्षारोपण

✔ **अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील मल्लिकार्जुन मंदिर येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त गटविकास अधिकारी सचिन खुडे, उमेश काटे, डोळे तसेच कोन्हाळी गावचे सरपंच चिदानंद उण्णद यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. मल्लिकार्जुन मंदिर ते यल्लामा देवी रस्त्याच्या दोन्ही बाजूला एक हजार वृक्ष रोपण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य मल्लिनाथ ढब्बे, तालुका भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती उन्नद, पोलीस पाटील संतोष बनसोडे, रवी गायकवाड, मुख्याध्यापक पवार आकाश बनसोडे, सुरेश पाटील गावातील महिला बचत गटाच्या सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविक ग्रामसेवक ए.बी. ताड तर आभार मुख्याध्यापक पवार यांनी मानले.

# पालकांना महाविद्यालयात का बोलावले म्हणून शिक्षकास मारहाण; चार जणांवर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/मोहोळ

महाविद्यालयात मुला मुलींच्या झालेल्या किरकोळ भांडणावरून तुम्ही त्यांच्या पालकांना का बोलविले? तुमचा काय संबंध आहे? असे म्हणत चार जणांनी शिक्षकाला शिवीगाळ मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना ३ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकरा वा. दरम्यान मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील एका महाविद्यालयात घडली.




याप्रकरणी शिक्षकाने दिलेल्या फिर्यादीनुसार चार जणांच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात शासकिय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपक बिभीषण वाघ हे टाकळी सिकंदर येथील एका कनिष्ठ महाविद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. दि. २ ऑगस्ट रोजी या कॉलेजमधील एका विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यामुळे शिक्षक वाघ यांनी दोन्ही मुलांच्या पालकांना शाळेत बोलाविले होते. त्यानुसार गुरुवारी कॉलेजमध्ये पालकांसमवेत चर्चा सुरू असताना अचानक अजय तानाजी जाधव व त्याच्या सोबत इतर तीन अनोळखी लोक आले. अजय जाधव याने शिक्षक वाघ यांना तुम्ही मुला मुलींच्या पालकांना कॉलेजमध्ये का बोलाविले? तुमचा काय संबंध आहे? असे म्हणुन शिवीगाळी केली तसेच अजय जाधव व इतर तीन अनोळखी लोकांनी शिक्षक वाघ यांना मारहाण करीत खाली पडले. त्यानंतर जीवे मारण्याची धमकी देऊन निघून गेला असल्याची फिर्याद दीपक वाघ यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दिली असून त्यानुसार पोलिसांनी चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलीस फौजदार लोबो चव्हाण करीत आहेत.

## माळीनगर येथे मिल रोलरचे पूजन

✔ सुराज्य/माळीनगर

येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या ९१ व्या गळीत हंगामाची तयारी चाललेल्या कामात कारखान्यातील रोलरच पूजन शुगरकेन सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे यांच्या हस्ते झाले.



शेतकऱ्यांनी तसेच कारखान्यातील कामगारांनी आपल्या नातेवाइकांना सांगून जास्तीत जास्त ऊस कारखान्याला पुरवठा कसा होईल हे पाहावे, असे कारखान्याचे नूतन मॅनेजिंग डायरेक्टर सतीश गिरमे यांनी रोलर पूजन कार्यक्रमप्रसंगी बोलताना गिरमे यांनी सांगितले. यावेळी कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे,माजी मॅनेजिंग डायरेक्टर नंदकुमार गिरमे, व्हाईस चेअरमन परेश राऊत, संचालक मोहन लांडे,नीळकंठ भोंगळे, अशोक गिरमे,राहुल गिरमे, शुगरकेन सोसायटीचे व्हाईस चेअरमन कपिल भोंगळे, संचालक मनीष रासकर, सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे संचालक अजय गिरमे व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कृषी माहिती पुस्तकाचे अनावरण

✔ **उ. सोलापूर** : पंचायत समिती उत्तर सोलापूर येथे जिल्हा कृषि अधिकारी पी.के. वाघमोडे यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या कृषी माहिती पुस्तक व नोटीस फलकाचे अनावरण गट विकास अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कृषि विभागाच्या नोटीस फलकावर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक लाभाच्या विविध योजनां व त्यासंबंधी माहितीचे क्यू आर कोड चार्ट लावण्यात आले आहे. यावेळी विस्तार अधिकारी कृषि राठोड यांनी कृषि विभागाच्या योजना बाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.या वेळी पंचायत समिती उत्तर सोलापूरचे सहाय्यक गट विकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, पशुधन विकास अधिकारी प्रशांत देशमुख, विस्तार अधिकारी (कृषि) जे.पी. माने, विस्तार अधिकारी, (कृषि) एस.आर. राठोड, क. प्र. अधिकारी एल. बी. बनसोडे, मोनिका, संजय पौळ उपस्थीत होते.

## शहरातील उड्डाणपुलासाठी सह्यांची मोहीम

✔ सुराज्य/सोलापूर

भविष्यात शहरात होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सुरू असलेले दोन उड्डाणपूल प्रकल्प त्वरित होण्याची गरज आहे. हे रखडलेल्या प्रकल्प लवकर सुरू व्हावे, यासाठी नागरी कृती समितीच्यावतीने एक लाख सह्यांची मोहीम राबविण्यात आली.सोलापूर शहरासाठी दोन उड्डाणपूल मंजूर होऊन नऊ वर्ष झाली. अद्याप उड्डाणपूल कामास सुरवात करण्यात आली नाही. शहरात खराब रस्त्यांमुळे व खड्ड्यांमुळे अपघात होऊन शेकडो निष्पापांचे बळी गेले आहेत. प्रशासन व लोकप्रतिनिधी याकडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांना जागे करण्यासाठी कृती समितीच्यावतीने ही सह्यांची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेत हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवला. या मोहिमेसाठी लखन बोद्धूल, देविदास चन्ना, रवी येमूल, राजेश कंदी, अनिल चौगुले, रवी परकीपंडला, पुरुषोत्तम बोग, विश्वनाथ येलदी, व्यंकटेश कुडक्याल, नरेश देवसानी आदी परिश्रम घेत आहेत.

# मंगळवेढ्यात वाहतूक पोलिसांच्या कारवाईत साडे तीन लाखांचा दंड वसूल

✔ सुराज्य/मंगळवेढा

वाहतूक शाखेच्या पोलिसांनी दुचाकी व चार चाकी वाहनांवर कारवाई करुन जुलै अखेर ३ लाख ३५ हजार १०० रुपये इतका दंड वसूल केला आहे. दरम्यान अतिवेग आणि दारु पिवून वाहन चालविल्याप्रकरणी पाचजणांविरुद्ध न्यायालयात खटले दाखल केले. याप्रकरणात त्यांना न्यायालयाने शिक्षाही सुनावली आहे.

वाहतूक शाखेच्या पोलिसांनी १ जुलै ते ३१ जुलै अखेर मोटर सायकलवर हेल्मेट न वापरणे, वाहनाला रिफ्लेक्टर नसणे, ट्रिपल सीट, नंबर प्लेट नसणे, फॅन्सी नंबर, लायसन्स नसणे, सीट बेल्ट अशा ४१९ मोटर सायकलस्वारावर विविध स्वरुपात कारवाई करुन ३ लाख ३५ हजार १०० रुपये इतका दंड आकारला.



प्रशिक्षणार्थी महिला पोलीस अधिकारी नयोमी साटम, डी.वाय. एस.पी.विक्रांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक शिवाजी पांढरे, पोलीस शिपाई प्रवीण जाधव, सचिन काळेल यांच्या पथकाने ही कारवाई करुन दंड वसूल केला.

### मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवरही कारवाई

पिवून व अतिवेगाने वाहन चालविल्याप्रकरणी आणि रस्त्यावर वाहतूकीस अडथळा येईल अशा पध्दतीने वाहन उभे करणे अशा विविध कारणास्तव पाच खटले न्यायालयात दाखल करण्यात आले होते. मोटर वाहन कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यात मंगळवेढा न्यायालयाने दारु पिवून वाहन चालविल्याप्रकरणी पाच मोटर सायकलस्वारांना शिक्षा सुनावली आहे.

## स्वेरीत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम

✔ **पंढरपूर** : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागांच्या संयुक्त विद्यमाने कन्व्हर्टींग इनोव्हेशन इन टू एन्ट्रप्रेन्युअरशीप अँड स्टार्टअप’ या विषयावर २४ जुलै ते दि.२९ जूलै २०२३ दरम्यान एक आठवड्याचा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम’ हा कार्यक्रम संपन्न झाला. या उपक्रमाचे उद्घाटन पुण्यातील निताल कॉम्प्युटर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुदर्शन नातू यांच्या हस्ते झाले. डॉ. दिप्ती तंबोळी यांनी प्रास्ताविकात हा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम’ आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट केला.

**CHANGE OF NAME**

I HERBY DECLARE THAT MY OLD NAME PARVEEN ATTAR HAS BEEN CHANGED TO **PARVE EN ASIF ATTAR** RESIDING AT PLOT NO-78, SAHARA NAGAR, NO-1, MAJREWADI HOTGI ROAD, SOLAPUR - 413003 KINDLY NOTE THE SAME.

# २०१ तृतीयपंथी आणि १५ हजार एचआयव्हीग्रस्तांना दिलासा

## तृतीयपंथी मित्र मदत केंद्र सुरु

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा एडस प्रतिबंध व नियंत्रण विभाग आणि महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्या वतीने टीजी हेल्प डेस्क (तृतीयपंथी मित्र मदत केंद्र) सुरू झाले आहे. कोरोना काळात बंद झालेला हेल्प डेस्क नव्याने सुरू होत असून जिल्ह्यातील २०१ तृतीयपंथी आणि १५ हजार एचआयव्हीग्रस्तांना दिलासा मिळाल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी यांनी दिली.

सर्व एचआयव्ही संसर्गितांना आणि तृतीयपंथियांना आयुष्यमान भारत योजनेंतर्गत कार्ड करुन दिले जाणार आहेत. आजच्या दिवशी ३५ तृतीयपंथींचे आयुष्मान भारत कार्ड काढण्यात आले. याबरोबरच एचआयव्हीसह जगणा-यांना जीवन कौशल्य कार्यक्रम (दिशा एक जगण्याची कला) राबविला जात आहे. त्याची सुरूवात शुक्रवारपासून झाली. त्वचा आजार, आहार-विहार, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना असे उपक्रम राबविले जात आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाचे मा.अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मा.जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मा.अचिहता सुधीर देशमुख, मा. शल्य चिकित्सक डॉ. डी. के. पाटील, वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी अग्रजा चिटणीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजनांचा टीजी हेल्पडेस्क सेंटर अंतर्गत शुभारंभ झाला. तृतीयपंथी मित्र मदत केंद्र, सोलापूर चे उदघाटन आशिष्ठाता यांनी केले.

या केंद्रातील आजारी रुग्णा करीता ६ खाट आरक्षित ठेवण्यात आले आहेत अशी माहिती दिली. तसेच आरोग्य पूर्ण जीवन नगणयासाठी एक खिडकी कार्यक्रम अंतर्गत तृतीयपंथी मित्र मदत केंद्रांना भेट देण्याचे आव्हान डॉ, चिटणीस यांनी केले आहे.

डॉ. जगताप यांनी महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना व पंत्रधान आरोग्य योजने बद्दल सविस्तर माहिती दिली. समाज कल्याणच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने बालसंगोपन योजनेतर्गत ४२ लाभार्थीना लाभ देण्यात आला आहे. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनाही ततीयपंथी आणि एचआयव्ही संसर्गितांना लागू करण्यात आली असून त्यांनाही पाच लांखांचा विमा मिळणार आहे. त्यासाठी सोलापुरात २९ रूग्णालय निवडले गेले आहेत. कार्यक्रमास अचिष्ठता डॉ. सुधीर देशमुख, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.अग्रजा चिटणीस, तसेच डॉ. चिंचोलकर विभाग प्रमुख सूक्ष्म जीवशास्त्र विभाग, डॉ. किणीकर मॅडम, डॉ. जगताप मॅडम, सेतू चे नागेशकुमार गंजी, कृष्णा सकट जिल्हा पर्यवेक्षक, सुवर्णा तुपसुंदरे आदी उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TENDER NOTICE**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Tender / Enquiry RFx No. | Amount (in Rs.) | EMD (in Rs.) | Tender Fee (in Rs.) | Tender Publication Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/ O&M/SUR/ SRM/T- 11/ 2023-24 | SRM Tender for the Work of Providing & Fixing of 3 Phase DSP System at various 220/132KV Substations under Jurisdiction of Trans O&M Division, Solapur. | **RFx No: 7000028114** | 20,27,797/- Including Taxes. | 21,000/- | 525/- Including GST | From 31.07.2023 @ 09:00 Hrs. to 08.08.2023 @ 18:00 Hrs. |
| 2 | EE/EHV/ O&M/SUR/ SRM/T-12/ 2023-24 | SRM Tender for the Work of Rate Contract for attending routine Maintenance work during Outage & Emergency work during Breakdown/ occurrence on various 220/132/110KV Lines under Jurisdiction of Trans O&M Division, Solapur. | **RFx No. 7000028113** | 25,00,000/- Including Taxes | 25,000/- | 525/- Including GST | From 31.07.2023 @ 09:00 Hrs. to 08.08.2023 @ 18:00 Hrs. |

For more details, please visit SRM website **www.mahatransco.in** or **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Details :** Add'l Executive Engineer - 7447441096, Dy. Executive Engineer - 7447441043

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV O&M Division, Solapur**

## महसूल सप्ताहाचा शेतकरी व विद्यार्थ्यांना मिळाला लाभ

# महसूल नोंदीत माढा तालुका सक्षम यावा : आ. शिंदे

सुराज्य/कुर्डूवाडी

**माढा उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१ ते ७ ऑगस्ट महसूल सप्ताह व शासन आपल्या दारी निमित्त माजी सैनिक, उत्कृष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान व शेतकरी, विद्यार्थी लाभ मिळाला आहे. माढा तालुका शंभर टक्के महसूल नोंद झालेला सोलापूर जिल्ह्यात एक नंबर तालुका असावा अशी अपेक्षा यावेळी आ. बबनदादा शिंदे यांनी व्यक्त केली.**



कुर्डूवाडी येथील पंचायत समितीच्या सभागृहामध्ये उपविभागीय कार्यालय व माढा तहसील यांच्या शासन आपल्या दारी व महसूल सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर माढ्याचे तहसीलदार विनोद रणवरे, करमाळ्याचे अप्पर तहसीलदार प्रशांत पाटील, समाधान बुटुकडे, करमाळ्याचे तहसीलदार विजयकुमार जाधव, प्रांत नायब तहसीलदार रविकिरण कदम, माढ्याचे नायब तहसीलदार विजय लोकरे, निवडणूक नायब तहसीलदार सायली जाधव आदी उपस्थित होते.

आमदार बबनराव शिंदे, म्हणाले शासन आपल्या दारी या माध्यमातून प्रत्येक मंडळात कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. यामध्ये आरटीओ विभागातून वाहन परवाने व एसटी बसचे विद्यार्थ्यांना पास देण्यासाठी या विभागालाही पत्र द्यावे. माढा तालुका शंभर टक्के महसूल नोंद झालेला सोलापूर जिल्ह्यात एक नंबर तालुका असावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर म्हणाल्या माजी सैनिकांच्या कोणत्याही समस्या असतील तर सोडवण्या जातील यांच्यासह कोणत्याही नागरिकांना हेलपाटे घालावे लागणार नाहीत याची काळजी घेतली जाईल. आमदारांनी केलेल्या सूचना व अपेक्षा व्यक्त केल्या त्या पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्व मिळून प्रयत्न करणार आहोत. उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील माढा महसुल सप्ताह निमित्त तालुक्यातील उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव सन्मान, कुर्डूवाडी येथील उम्मीद संस्थेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व ड्रेस वाटप, माजी सैनिकांना सैनिकांचा सत्कार, सन्मान, तालुक्यातील शेतकऱ्यांना सातबारा, आठ अ, फेरफार, विद्यार्थ्यांना जातीचे व नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र आदींचे वाटप करण्यात आले. माढा तहसीलच्या वतीने डॉ .विनायकराव वागळे उम्मीद संस्थेतील अकरा विद्यार्थ्यांना धान्य मिळावे म्हणून रेशन कार्ड देण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांसाठी धान्य मिळणार आहे.यावेळी अव्वल कारकून जितेंद्र कदम, प्रदीप बांगर, हनुमंत जाधव, शबाना कोरबू, पुनम कांबळे सह मंडल अधिकारी, अव्वल कारकून, लिपीक, कोतवाल, पोलीस पाटील, शिपाई आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तलाठी प्रीती काळे यांनी केले तर आभार तहसीलदार प्रशांत पाटील यांनी मानले.

### बबनदादांच्या वक्तव्याने चर्चा

माढा तालुक्यात शासन आपल्या दारी या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री अजितदादा पवार येणार असल्याचे असा आमदार बबनदादा शिंदे यांनी भाषणात उल्लेख केल्यामुळे मुख्यमंत्री अजितदादा होणार का? याचे संकेत दिले असल्याची या ठिकाणी चर्चा सुरू झाली.



## पडसाळी वि.का. सोसायटी चेअरमनपदी मुटकुळे यांची निवड

**माढा** : पडसाळी (ता. माढा) येथील विविध कार्यकारी. सेवा सोसायटीची चेअरमन निवड प्रक्रिया नुकतीच ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. नूतन चेअरमनपदी नारायण मुटकुळे यांची तर व्हा. चेअरमनपदी बाळु थोरात यांची निवड झाली. राजी चेअरमन दादासाहेब देशमुख व व्हा. चेअरमन तुकाराम सलगर यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर ही निवड सर्वानुमते करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन कोळी साहेब व सेक्रेटरी राऊत भाऊसाहेब यांनी काम पाहिले. यावेळी सोसायटीचे संचालक दादासाहेब देशमुख, तुकाराम सलगर, आण्णासाहेब मुटकुळे, गणपत मुटकुळे, विजयकुमार फरड, बालाजी फरड, शारदा अदिनाथ मुटकुळे, अनिता लक्ष्मण देशमुख हे उपस्थित होते. यावेळी सरपंच योगेश पाटील, दत्ता नाना फरड, सचिन पाटील, कुर्मदास पाटील, गोपिनाथ मुटकुळे, मच्छिंद्र मुटकुळे, जालिंदर पाटील, उपसरपंच विष्णु फरड, ग्रामपंचायत सदस्य आण्णासाहेब मुटकुळे, ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत देशमुख, तानाजी देशमुख, महेश पाटील, महावीर मुटकुळे, दत्तात्रय देशमुख, रामभाऊ सलगर, संतोष पाटील, प्रवीण पाटील, प्रकाश पाटील, अनुरथ पाटील, निलेश शिंगाडे, बापू सलगर, नामदेव मुटकुळे, सदाशिव जगदाळे, भारत सुतार, भिकाजी थोरात, नारायण थोरात, हनुमंत देशमुख, लक्ष्मण देशमुख, महादेव पाटील, सुकुमार मुटकुळे, संजय मुटकुळे, पिंटू सलगर, सिध्देश्वर देशमुख, परेश देशमुख, अक्षय पाटील, शुभम मुटकुळे, संतोष थोरात, यांच्यासह मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

## १५ ऑगस्टपर्यंत ग्रामपंचायती हागणदारी मुक्त करा : आव्हाळे

सुराज्य/सोलापूर

येत्या १५ ऑगस्टपर्यंत जास्तीत जास्त ग्रामपंचायत हागणदारी मुक्त करा, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन ची कामे वेळेत करा. ट्रायसायकल व डस्टबीन व शौषखड्डे ची कामे वेळेत पुर्ण करा. केंद्र शासानाचे संकेतस्थळावर माहिती अपडेट करा. सर्व संस्थांचे प्रशिक्षण घ्या. आधी कामांची योग्य माहिती करून घ्या, असे आवाहन सीईओ मनिषा आव्हाळे यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत आढावा बैठकीचे आयोजन करणेत आले होते, त्यात आव्हाळे बोलत होत्या. स्वच्छ भारत मिशन व जलजीवन मिशनच्या कामांनी गती येई पर्संत दर शनिवारी मिटींग घेणार आहे. जलजीवन मिशन मध्ये हालगर्जी पणा खपवून घेणार नाही. केंद्र शासनाचा प्राध्यान्याची योजना आहे, असे आव्हाळे यांनी सांगितले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी जलजीवन मिशन ची विस्तृत माहिती दिली.

योजनेत गती देण्यासाठी सरिवांचे सहकार्य अपेक्षित आहे. प्रत्येक घटकात कारवाई करणे पेक्षा योजना व अडचणी समजून घेणे साठी ठेकेदारांसह बैठक सिईओ यांनी घेणेचे सुचना दिले आहेत. यामागचा उद्देश्य वेळेत योजना पूर्ण होणे हा आहे. असेही जाधव यांनी सांगितले. कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी नळ कनेक्शन वेळेत पूर्ण करा. हर घर जल से नल अंतर्गत गावांची ऑनलाईन नोंदी करणेचे सांगून योजनेतील जागा नसलेले ग्रामपंचायती तसेच जे ठेकेदार काम करणार नाही त्यांचेवर कारवाई करणेचा स्पष्ट इशारा दिला.

## रिपाइंची ९ ऑगस्टला रोजी वेळापुरात बैठक


सुराज्य/मोहोळ

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाच्या जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन वेळापूर (ता माळशीरस ) येथे बुधवार ९ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील पदाधीकारी यांनी उपस्थीत रहवे असे अवाहन जिल्हा सरचिटणीस शामसुंदर (रवी ) गायकवाड यांनी केले आहे

या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, सोलापूर जिल्हा पक्ष निरीक्षक असीत गांगुर्डे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत या बैठकीच्या अध्यक्ष स्थानी सोलापूर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले हे राहणार आहेत या बैठकीत सातारा येतील पश्चिम महाराष्ट्र कार्यकर्ता शिबिरा बाबत चर्चा करणे, क्रियाशील सभासद वाढविणे बाबत आढावा घेणे , जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी निवड ,आयत्या वेळेचे विषय यावर चर्चा करण्यात येणार आहे . तरी जिल्ह्यातील सर्व कार्यकारिणी प्रतिनिधी, पश्चिम महाराष्ट्र प्रतिनिधी, सोलापूर जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, युवक आघाडी सर्व पदाधिकारी व जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष व त्यांचे सर्व कार्यकारणी सदस्यांनी सदर बैठकीला ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता श्री शिवशंभो मंगल कार्यालय वेळापूर येथे उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा सरचिटणीस शामसुंदर ( रवी ) गायकवाड यांनी केले आहे

## रस्ता दुरुस्तीसाठी उपळाई बु येथे रस्ता रोको आंदोलन

सुराज्य/माढा



तालुकयातील उपळाई बुद्रूक ते अंजनगाव खेलोबा या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी माढा - शेटफळ रस्त्यावरील उपळाई बुद्रूक येथे स्थानिक नागरिक व सर्वपक्षीयांच्या वतीने शनिवारी सकाळी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था असून, पावसाळ्यात विद्यार्थ्यांसह दुग्धव्यवसायिकांचे प्रचंड हाल होतात. त्यामुळे तातडीने रस्ता दुरुस्त करावा या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले होते. यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्पुरते खड्डे बुजवून, रस्ता दुरुस्तीसाठी पाठपुरावा करतो असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी रस्त्यावरून वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आंदोलनप्रसंगी शिवदत्त भोसले, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, प्रकाश नागटिळक, मनसेचे प्रशांत गिड्डे, सामाजिक कार्यकर्ते शंभू साठे, रासपचे गोरख वाकडे, श्रीकृष्ण डुचाळ, संतोष गायकवाड, गजानन झाडबुके, संदिप गोरे, विकास बेडगे, बाबा कांबळे, अण्णा शेटे, तानाजी शिंदे, संतोष कळपे, श्रीकांत ढवळे, सचिन पाटील, दादा गोरे, दत्तात्रय डुचाळ यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माढा पोलीस ठाण्याच्या वतीने बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



## अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना सुरक्षा किटचे वाटप

**उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील तिऱ्हे येथे माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त वायरमन, ग्रामपंचायत मधील विविध अत्त्यावश्यक सेवा पुरवनाऱ्या कर्मचाऱ्यांना सुरक्षाकिट व रेनकोटचे पृथ्वीराज युवा मंच शाखेच्या वतीने वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना उजळणी व शालेय साहित्य, खाऊ वाटप, सिध्दिविनायक गणेश मंडळ व न्यू इंडियाच्या वतीने अंगणवाडी मुलाना साहित्य वाटप, भोईराज तरुण मंडळ तर्फे खाऊ वाटप, डॉ भैय्यासाहेब वळसंकर प्रशाला येथे खाऊ वाटप व वृक्षारोपण करण्यात आले. अध्यक्षस्थानी बाळासाहेब सुरवसे, सरपंच नेताजी सुरवसे, ए पी आय आनंद थिटे, सोसायटी चेअरमन - भास्कर सुरवसे, अजय सोनटक्के, गोवर्धन जगताप, शालेय समिती अध्यक्ष अनिल वाघमारे, भगवान चव्हाण, संजय राठोड,माजी सरपंच गुरुदेव गायकवाड, प्रदीप सुरवसे, अण्णा सुरवसे, हणमंत सुरवसे, आनंद जाधव, महेश आसबे, योगेश पाटील, अनिल शिंदे, गोविंद सुरवसे, सैपन शेख, बिभीषण मल्लाव, दादासाहेब मल्लाव, शशिकांत मलाव, बाबासाहेब गवळी, दीपक मल्लाव, संजय मल्लाव, गोरख मल्लाव, विशाल इरशेट्टी, सचिन सासणे, रमेश इरशेट्टी, बलभीम शिंदे, प्रदीप पवार, सुरेश राठोड, संदीप सुरवसे, दादा गायकवाड, मुख्याध्यापक काशींद, कोळी, मोरे, भागवत गायकवाड उपस्थित होते.

## आजी–माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध : शिरसट

सुराज्य/अक्कलकोट



सैनिकांच्या बाबतीतील विविध विषयासंदर्भात विशेष प्राधान्य देऊन अडचणी सोडविण्यात येतील असे आश्वासन तहसिलदार बाळासाहेब शिरसट यांनी दिली.

महसूल सप्ताह अंतर्गत अक्कलकोट तालुक्यातील सर्व आजी-माजी सैनिक, शहीद जवान, स्वातंत्र्यसैनिक यांचे कुटुंबीय यांच्या अडीअडचणी बाबत आढावा बैठक पंचायत समिती सभागृह येथे शनिवारी पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीला तहसीलदार बाळासाहेब सिरसट, भूमी उपअधीक्षक भूमी अभिलेख शैलेंद्र शिंगणे, उत्तर पोलीस स्टेशनचे पीआय जितेंद्र कोळी, निवासी नायब तहसीलदार विकास पवार, पंचायत समितीचे विस्ताराधिकारी, कृषी विभागाचे विस्तार अधिकारी, महसूल चे कर्मचारी मंडळाधिकारी तलाठी तसेच संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब भोसले व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सैनिकांच्या बाबतीतील विषयासंदर्भात विशेष प्राधान्य देऊन अडचणी सोडविणार याची खात्री देण्यात आली.या बैठकीला तालुक्यातील सैनिक, त्यांचे कुंटुंबीय, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवशंकर सोसायटीचे चेअरमन व व्हा.चेअरमन यांचा सत्कार

सुराज्य/वेळापूर



मळोली येथील नुकत्याच झालेल्या शिवशंकर विविध कार्यकारी सेवा सोसायटीची निवडणूक बिनविरोध झाली होती. संस्थेच्या चेअरमनपदी जयराम जाधव आणि व्हाईसचेअरमन पदी सौ सुरेखा रवींद्र फडतरे यांची बिनविरोध निवड झाली यांचा सत्कार भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला मळोली गावचे माजी उपसरपंच चंद्रकांत जाधव, जगन्नाथ जाधव, शशांक जाधव, बाळासाहेब घोरपडे , पांडुरंग जाधव, शिवाजी जाधव, महादेव जाधव, अरुण पवार, अंकुश देवकते, वाघमोडे, हनुमंत जाधव, भारत जाधव, ज्ञानेश्वर ढेंबरे, शिवाजी वाघमारे, भानुदास तुपे, संतोष घोरपडे, शिवाजी पवार सौरभ जाधव तसेच सोसायटीचे आजी माजी चेअरमन, संचालक, तसेच ग्रामपंचायतीचे आजी-माजी सदस्य, बुथ अध्यक्ष, सोसायटीचे प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बुऱ्हाणपूर येथे लहुजी शक्ती सेनेच्या नामफलकाचे अनावरण

**अक्कलकोट** : बुऱ्हाणपूर (ता. अक्कलकोट) येथे लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०३ व्या जयंतीचे औचित्य साधून लहुजी शक्ती सेनेच्या नामफलकाचे अनावरण जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी लहुजी शक्ती सेनेचे सुधाकर पाटोळे, जिल्हा कार्याध्यक्ष रामअण्णा कांबळे यांच्या उपस्थिती होती. हन्नूर गावचे सरपंच सागर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यानंतर मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. विशाल ठोंबरे, भारत देडे, सद्दाम शेख, समर्थ देडे, मनसे शहर संघटक देवेंद्र शिंदे, विठ्ठल उकरंडे, सुगंधव करंडे, विशाल उकरंडे, हनुमंत उकरंडे, राजेंद्र उरंडे, वैभव उकरंडे, भागवत उकरंडे आदी मान्यवर मोठ्या प्रमाणात या ठिकाणी उपस्थित होते.

# ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमासाठी प्रत्येक विभागाने सूक्ष्म नियोजन करावे : जिल्हाधिकारी

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पंढरपुरात येणार

सुराज्य/पंढरपूर



विविध शासकीय योजनांचा जनतेला थेट लाभ देण्यासाठी शासन आपल्या दारी हा लोकाभिमुख उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. शासन आपल्या दारी अभियानातर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित २६ ऑगस्ट रोजी पंढरपूर येथे जिल्हास्तरीय कार्यक्रम नियोजित आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक विभागाने समन्वयाने सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे शासन आपल्या दारी उपक्रमाचा आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, अधिक्षक अभियंता संजय माळी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधन शेळकंदे, एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक विनोदकुमार भालेराव, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, नगरपालिका प्रशासन अधिकारी अशिष लोकरे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, कार्यकारी अभियंता श्री निंबकर, व अधिकारी उपस्थित होते.

जल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, राज्यातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी शासन आपल्या दारी’ उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या तालुकानिहाय महसूल, कृषी, कामगार, पंचायत समिती, आरोग्य विभाग आदी विभागांच्या लाभार्थ्यांची योजनेच्या नावासह माहिती तयार करावी. अधिकाधिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ देण्याबाबत नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

या कार्यक्रमास सुमारे ४० हजारापेक्षा अधिक नागरिक उपस्थित राहणार असल्याने एकाही लाभार्थ्याची गैरसोय होणार नाही या अनुषंगाने आवश्यक नियोजन करावे असे सांगून वाहतुक व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, वाहनतळ, आरोग्य सुविधा, लाभार्थ्यांची बैठक व्यवस्था, लाभार्थ्यांना लाभाचे वाटपाचे नियोजन करण्याचे त्यांनी सुचित केले. सर्व विभागांनी आपल्यावर सोपविलेली कामाची जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

## तृप्ती गेजगला ग्रीन बेल्ट कराटे स्पर्धेत सुवर्णपदक

**माळीनगर** : अकलूज येथे संपन्न झालेल्या ग्रीन बेल्ट या कराटे स्पर्धेमध्ये लवंग ता. माळशिरस येथील तृप्ती गेजगे हिने सुवर्णपदक मिळवत कराटे स्पर्धेत यश संपादन केले आहे.



तृप्ती हिने नुकतेच पुणे जिल्हा असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत ब्रांझ पदक मिळवले आणि तायक्वांदो असोसिएशन ऑफ सोलापूर (रजी ) तर्फे आयोजित सांगोला येथे झालेल्या तायक्वांदो स्पर्धेत तिने सुवर्णपदकही मिळवले होते. तायक्वांदो, वुशु, किक बॉक्सिंग, कराटे इ. प्रकारात तिने यश संपादन केले आहे बाराव्या वर्षी पासून ती या क्रीडा प्रकारांचा सराव करत आहे. प्रीतम कांबळे माळीनगर यांचे तिला मार्गदर्शन लाभत आहे. गावातील बरेचसे लोक मुलीला एवढे शिकवू नको, मुलांसारखे लाड करू नको असे सांगत असताना देखील मी मुलगा किंवा मुलगी असा भेदभाव केला नाही. तिच्या प्रत्येक यशात - अपयशात मी पाठीशी राहणार आहे, असे तृप्तीचे वडील पोपट गेजगे यांनी सारंगितले.

### देशहिताचे काम करायचे आहे

आजच्या युगात प्रत्येक मुलगी स्वतंत्र व निर्भय झाली पाहिजे. स्वसंरक्षणाचे धडे प्रत्येक मुलीला आले पाहिजेत. आपल्या परिस्थितीचा बाऊ न करता त्यावर मात करीत नावीन्याचा ध्यास घेतला पाहिजे. मला पुढे जाऊन देशहिताचे काम करायचे असून भारत मातेची सेवा करण्याचे स्वप्न आहे, असे तृप्ती गेजगे हिने सांगितले.

# स्व. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह समितीतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

**स्व. वि. गु. शिवदारे स्मृति समारोह समितीच्यावतीने सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक लिमिटेड, श्री स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणी, वळसंग, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ सोलापूर, सिद्ध संघ प्रतिष्ठान सोलापूर, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी घाऊक व किरकोळ ग्राहक भांडार, सोलापूर यांच्यावतीने सहकारमहर्षी वि. गु. शिवदारे यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त ८ ऑगस्ट ते १७ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन प्रकाश वाले यांनी दिली.**

मंगळवार दि. ८ ऑगस्ट रोजी सायं. पाच वाजता गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ डॉ. शशिकांत हलकुडे यांच्या हस्ते आणि स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणी वळसंगचे चेअरमन राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होईल. हा कार्यक्रम हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होणार आहे. तर बुधवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता क्रांती दिनानिमित्त सोलापुरातील स्वातंत्र्य चळवळीबाबत डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचं माहितीपूर्ण व्याख्यान होणार असून पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्या हस्ते विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आलेल्या मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे उद्‌घाटन होणार आहे. हा कार्यक्रम विजापूर रस्त्यावरील फार्मसी कॉलेजच्या सभागृहात होणार आहे.

गुरुवार दि.१० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता डॉ. अरुण मनगोळी यांच्या हस्ते आणि अमोल गवसने यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन होणार आहे तर सकाळी १० वाजता थॅलेसिमिया आजारावर डॉ. सुनील हिलालपुरे आणि डॉ. अरुण मनगोळी यांचे माहितीपूर्ण होणार आहे. तर शुक्रवार दि. ११ ऑगस्ट सकाळी १० वाजता विद्यार्थ्यांसाठी दंत-आरोग्य तपासणी शिबिराचे उद्‌घाटन डॉ. कौस्तुभ तांबेकर यांच्या हस्ते आणि डॉ. राजेंद्र घुले आणि डॉ. शिरीष कुमठेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत युनिक इंग्लिश मीडियम स्कूल फार्मसी कॉलेजच्या आवारात हा कार्यक्रम होईल.

शनिवार दि. १२ ऑगस्ट सकाळी १० वाजता विज्ञान प्रयोग आणि प्रदर्शनाचे उद्‌घाटन महापालिकेचे अतिरिक्त उपायुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. व्यंकटेश गंभीर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. रविवार दि. १३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे उद्‌घाटन प्रसिद्ध शिल्पकार सागर रामपुरे यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल तर कला आणि व्यवसाय केंद्राचे माजी प्राचार्य गोपाल डोंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार



आहे. सायंकाळी ५ वाजता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांच्या हस्ते आणि राजशेखर शिवदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राहक मेळाव्याचे उद्‌घाटन होईल हा कार्यक्रम दंतकाळे हॉस्पिटलशेजारी प्रमोद नगर येथे होणार आहे.

सोमवार दि. १४ ऑगस्ट सकाळी ९-३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे उद्‌घाटन डॉ. शिरीष कुमठेकर, डॉ. प्रशांत गाडे, डॉ. आशुतोष यजुर्वेदी, डॉ. आरोषी मनगोळी, डॉ. दिपाली गाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल तर मंगळवार दि.१५ ऑगस्ट सकाळी ७ वाजता ज्येष्ठ विधीज्ञ उमेश मराठे यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्‌घाटन होईल. तर बुधवार दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचे उद्‌घाटन जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्या हस्ते आणि पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवदारे महाविद्यालयात होईल. गुरुवार दि. १७ ऑगस्ट स्मृती समारोहाचा सांगता समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत होईल.

या कार्यक्रमाला पालक आणि नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त भीमाशंकर शेटे आणि सिद्धेश्वर सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी केले आहे.




## माथाडी कायद्यातील तथाकथित सुधारणा विधेयक त्वरीत मागे घेण्याची मागणी

✔ **सोलापूर** : माथाडी कायद्यातील तथाकथित सुधारणा विधेयक एलए बील नं. ३४ ऑफ २०२३ हे विधानसभा विधेयक माथाडी, मापाडी व असुरक्षित कामगारांना जाचक असून अन्यायकारक आहे. या तथाकथित सुधारणा विधेयकाचा विरोध करण्याची सूचना राष्ट्रीय कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांनी दिल्याने त्यांच्या आदेशानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूरमधील सर्व संघटनांनी एकत्र येऊन सोलापूर जिल्हा परिषद येथील पूनम गेट या ठिकाणी सदर विधेयकाचा निषेध करीत आंदोलन केले व जिल्हाधिकाऱ्यांना सदर विधेयक मागे घेण्याकरिता निवेदन दिले.

याप्रसंगी सोलापूर जिल्हा पातळीवरील माथाडी व मापाडी कामगार नेते भीमराव सिताफळे, दत्ता मुरुमकर, गफार चांदा, रणजित शिंदे-पाटील, महेंद्र चंदनशिवे, किरण मस्के, नागनाथ खंडागळे, संजय डांगे, उमाकांत दुलंगे, आकाश नरवडे, राजू हरिदास, विशाल साबळे, विशाल मस्के, दत्ता बसवेश्वर, राजू दणाणे, गुरुशांतय्या पुराणिक, विजय स्वामी, शिवलिंग शिवपुरे, श्रावण कांबळे, गौतम लालसरे, अब्बू जमादार, सिद्धू हिप्परगी, शिव जमादार असंख्य कामगार वर्ग उपस्थित होते.




## कृषी उत्पन्न बाजार समितीत दिलीप माने यांचा वाढदिवस साजरा

✔ **सोलापूर** : ३ ऑगस्ट हा दिवस ता. उत्तर सोलापूरचे भूमिपुत्र व ता. दक्षिण सोलापूरचे माजी आमदार कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूरचे माजी सभापती तसेच व विद्यमान संचालक सहकार शिरोमणी ब्रह्मदेव माने सहकारी बँकेचे अध्यक्ष अशा विविध पदांच्या अलंकारांनी नटलेले नेतृत्व म्हणजे नामदार दिलीपराव माने यांचा वाढदिवस सोलापूर बाजार समितीत साजरा करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूरमधील माथाडी कामगार विकास मंडळ सोलापूर या संघटनेकडून माथाडी, मापाडी व स्त्री कामगारांमध्ये लाडूचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजक बाजार समितीमधील लोकप्रिय कामगार नेते गफारभाई चांदा हे होते. याप्रसंगी दत्ता मुरूमकर, ललिता मुळे, यशोदा गायकवाड, महेंद्र चंदनशिवे, रणजित शिंदे-पाटील, किरण मस्के, मर्जीपीर शेख, शामलिंग शिवपुरे, योगिनाथ कोरे, बाळकृष्ण गणपा, विठ्ठल पुजारी, मल्लिनाथ अब्बा, महादेव कोळी, मौला जहागीरदार, सिद्धाराम फुलारी, शरणप्पा धनुरे, जावेद नदाफ, महेबूब बरुर, रोहित नदाफ, बिल्लाल जमादार, महेबूब शेख, दस्तगीर बेपारी, अब्बू जमादार, जगदीश धनुरे, सैफन शेख, आजमोद्दीन शेख, रुक्मिणीबाई कोळी, पुष्पा कोळी, सत्यव्वा हक्के, लक्ष्मी पुजारी, कस्तुराबाई शिंदे, मनोज मुळे, मधुकर सलगर इ. असंख्य माथाडी, मापाडी व स्त्री कामगार उपस्थित होते.



## होलार समाज संघटनेच्यावतीने दहावी, बारावीमधील गुणवंतांचा सत्कार

✔ **सोलापूर** : अखिल भारतीय होलार समाज संघटना सोलापूर शाखेच्यावतीने समाजातील १०वी, १२वी तसेच स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समाज कल्याण केंद्र, रंगभवन येथे पार पडला. यावेळी समाजातील सामाजिक कार्यकर्ते कै. राजा माने यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रथमत: होलार समाज बांधवांच्यावतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झालेले संदेश भीमराव जावीर तसेच त्यांचे बंधू विशाल जावीर यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याने समाजातर्फे विशेष गौरव करण्यात आला. याप्रसंगी संदेश जावीर यांनी गौरवपर भाषण करताना समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले व स्पर्धा परीक्षेत यश कसे संपादन करावे, त्यासाठी लागणारी गुणवैशिष्ट्ये कोणती? या पदापर्यंत जाण्याकरिता त्यांनी घेतलेले अपार कष्ट, प्रयत्न, जिद्द, चिकाटी, सातत्य हेच माझ्या यशाचे गमक असल्याचे सांगितले.



## चौधरी रसूल मदार यांची प्राचार्य म्हणून निवड

✔ **सोलापूर** : सोलापूर सोशल असोसिएशन उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या संस्थेचे प्राचार्य म्हणून चौधरी रसूल मदार यांची निवड करण्यात आली. सोलापूर शहरात गेल्या ५९ वर्षांपासून सोलापूर सोशल असोसिएशन उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, सोलापूर येथे कार्यरत आहेत. सदर चौधरी रसूल मदार यांचा भागनगरी मोहम्मद शरीफ वलियोद्दीन व त्यांचा मित्र परिवार यांनी पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भागनगरी मोहम्मद शरीफ वलियोद्दीन व त्यांचा मित्रपरिवार व शाळेतील मान्यवर व उपप्राचार्य शाब्दी इम्तियाज, सलीम पिरजादे, अचकल अस्लम, मुफीज मायामी, कडेचूर गौस व इतर स्टाफ उपस्थित होते.

## किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ७ ऑगस्टपासून

✔ सुराज्य/सोलापूर

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यंदा ७ ते १० ऑगस्ट दरम्यान सोलापुरात होणार आहे. यात सकस अन्न, समृद्ध निसर्ग व आरोग्यपूर्ण समाज यावर मंथन होणार आहे.

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन सोमवार, ७ ऑगस्ट रोजी स. ९ वा. कुमठे येथील चंद्रकांत फुलमाळी यांच्या शेतात शाश्वत कृषीतज्ञ नरेंद्र खोत यांच्या हस्ते आणि किर्लोस्कर कंपनीचे प्रकल्प प्रमुख संतोष गुमास्ते, महोत्सव संचालक वीरेंद्र चित्राव, किर्लोस्कर कंपनीचे जनरल मॅनेजर (एच. आर.) विलास खरात यांच्या होणार आहे. यावेळी परशुराम लांबतुरे आणि शिवानंद हिरेमठ यांना वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान करण्यात येणार येईल. त्याचदिवशी दुपारी ३ वाजता व्हीव्हीपी अभियांत्रिकी महाविद्यालयात पर्यावरण विषयक स्टार्टअप स्पर्धा घेण्यात येणार आहे. याप्रसंगी किर्लोस्कर कंपनीचे जनरल मॅनेजर (एच. आर.) विलास खरात यांची प्रमुख उपस्थिती राहील.

८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सेवासदन प्रशालेत भरडधान्य प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. तर दुपारी ४ वाजता किर्लोस्कर कंपनीतील लेडीज क्लब हॉल येथे शहरी शेती कार्यशाळा आणि भरड धान्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. बुधवार ९ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता विजयपूर रस्त्यावरील स्मृती उद्यानात निसर्ग फेरी होणार असून यावेळी शिवानंद हिरेमठ, संजय भोईटे तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी रघुनाथ कांबळे मार्गदर्शन करणार आहेत. तर दुपारी ३ वाजता कॉलेज ऑफ फार्मसी येथे 'कोविडनंतर औषधे आणि आरोग्यावरील परिणाम' या विषयावर डॉक्टरांचे चर्चासत्र होणार आहे. महोत्सवाचा समारोप गुरुवार १० ऑगस्ट रोजी होणार आहे. दुपारी १ वाजता वि. मो. मेहता शाळेत 'भरडधान्य आणि पर्यावरण' या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात येईल. तर दुपारी २ वाजता कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते समारोप होणार आहे.

महोत्सवात सहभागी होऊन आपल्या सकस अन्न आणि पर्यावरण विषयक जाणीवा अधिक समृद्ध कराव्यात, असे आवाहन महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, किर्लोस्कर कंपनीचे जनरल मॅनेजर (एच. आर.) विलास खरात, ऋषीकेश कुलकर्णी, दैदिप्य वडापूरकर यांनी केले आहे.

## इत्तेहादुल पक्षाच्या उपाध्यक्षपदी सय्यद

✔ सुराज्य/सोलापूर

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खासदार सय्यद इम्तियाज जलील यांच्या मार्गदर्शनानुसार व महिला प्रदेश अध्यक्ष कीर्ति डोंगरे-गोडबोले यांच्या सुचनेनुसार सोलापूर येथील सलमा सय्यद यांची पक्षाच्या महिला आघाडी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

सदर निवडीचे पत्र पुणे शाखेचे जिल्हाध्यक्ष अकील मुजावर व पिंपरी चिंचवड महिला अध्यक्षा रुहिनाज शेख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सलमा सय्यद यांची महिला आघाडी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल एमआयएम पक्षाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष हाजी फारुक शाब्दी, गाजी जहागीरदार, जियाउद्दीन आबादीराजे, समद शेख, इसाक शेख, समीर सय्यद, कम्मो शेख, रेशमा मुल्ला आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## क्रांतिदिनानिमित्त भव्य रक्तदान शिबीर

✔ सुराज्य/सोलापूर

नॅशनल रेल्वे मजदूर युनियनतर्फे क्रांतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन सोलापूर रेल्वे स्टेशन बुकींग ऑफिससमोर करण्यात आले होते. उद्‌घाटन विभागीय रेल्वे प्रबंधक निरज दोहरे - वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी, जी. पी. भगत वरिष्ठ विभागीय इंजिनिअर समन्वय, चंद्रभूषण विभागीय इंजिनिअर मध्य., रविंद्र सिंघल वरिष्ठ विभागीय सेफ्टी अधिकारी, शिवाजी कदम आणि मुख्य चिकित्सक अधिकारी डॉ. रामकृष्ण माने यांच्या हस्ते शहीद भगतसिंग यांच्या स्मृतीस माल्यार्पण व दीपप्रज्वलित करुन उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी विभागीय सचिव कॉ. सजी जेकब यांनी सर्व मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच युनियनने रेल्वे कर्मचाऱ्यांच्या अडी-अडचणी प्रशासनामसमोर मांडून सोडविण्याचे कार्य केले जाते. त्याचबरोबर सामाजिक कार्य सुद्धा करण्यात येते, असे सांगितले.

यामध्ये १६६ रक्तदात्यांनी रक्तदान करुन या थोर मानवतावादी कार्यास आपला हातभार लावला आहे. त्याबद्दल एनआरएमयुच्यावतीने विभागीय सचिव कॉ. सजी जेकब यांनी सर्व रक्तदात्यांचे अभिनंदन केले.

## शहरात आज दारू दुकाने बंद

✔ **सोलापूर** : अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहर व बार्शी शहरात मोठ्या प्रमाणात मिरवणुका निघणार असल्याने त्या ठिकाणी सार्वजनिक शांतता राखणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ६ ऑगस्ट सोलापूर शहर तर ७ ऑगस्ट बार्शी शहरातील सर्व देशी व विदेशी, ताडी विक्री व्यवहार बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## श्री आंध्र भद्रावती विद्यालयात पालक शिक्षक संघ सभा

✔ **सोलापूर** : श्री आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात पालक शिक्षक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. प्रास्ताविक प्रशालेच्या सहशिक्षिका एस. एस. दुलंगे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून कुलकर्णी (ब्रेन कन्सलटन्सी शिक्षण समुपदेशनचे संस्थापक) व व्यंकटेश दुडम संस्थेचे सेक्रेटरी हे लाभले. त्यांनी पालकांना आपल्या पाल्यांच्या सर्वांगिण विकासासाठी योग्य ते मार्गदर्शन करुन इथून पुढे सुद्धा इ. १०वीच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी ब्रेन एज्युकेशनच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे वचन दिले. मुख्याध्यापक मल्लिकार्जुन मोरडे यांनी सुद्धा पालकांना योग्य ते मार्गदर्शन करुन आपल्या पाल्याच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्याचे आवाहन केले.

## कोळी समाजातील गुणवंतांचा सत्कार

✔ **सोलापूर** : श्री महर्षी वाल्मिकी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर या संस्थेमार्फत रविवार २७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कोळी समाजातील इ. १०वी व इ. १२वी मध्ये यावर्षी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व इतर क्षेत्रात राज्य, राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी मार्कशीटची झेरॉक्स प्रत व आयडेंटी साईज फोटो संस्थेच्या कोळी समाज नं. २ येथील संस्थेच्या कार्यालयात १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत पोहोच करावेत, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे. संस्थेच्या इतर सभासदांच्या मुला-मुलींना यात भाग घेण्यात येईल, याची नोंद घेण्यात येईल.

## विजापूर रोड मध्य. मंडळाची १५ ला बैठक

✔ **सोलापूर** : विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत असलेल्या विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. १५ ऑगस्ट रोजी सायं. ५ वाजता मागाससेवा मंडळ, नेहरुनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. यावेळी मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे नूतन उत्सव पदाधिकारी निवड करण्यात येणार आहे. मध्यवर्ती मंडळाचे संस्थापक सदस्य व विश्वस्त माजी आमदार शिवशरण अण्णा बिराजदार-पाटील, विजय शाबादी, बाबूराव लद्दे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

## माथाडी व बांधकाम कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप

✔ **सोलापूर** : महाराष्ट्र राज्य माथाडी व बांधकाम कामगार संघटनेचे राज्य अध्यक्ष व शिवसेना ठाणे विभाग प्रमुख दिनेश मलपे यांचा वाढदिवस सोलापुरात विविध उपक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. शहरातील आंध्रभद्रावती मराठी विद्यालयातील विडी व बांधकाम कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम शिवसेना कामगार आघाडीचे शहर अध्यक्ष सायबण्णा तेग्गेळी यांच्या पुढाकाराने पार पडला. शिवसेना जिल्हा प्रमुख अमोलबापू शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व शहर शिवसेना महिला आघाडीप्रमुख जयश्री पवार, उपप्रमुख मनिषा नलावडे, उपप्रमुख शिवाजी निळ, अध्यक्ष सायबण्णा तेग्गेळी, तालुका प्रमुख नवनाथ चव्हाण, सल्लागार मल्लिनाथ परशेट्टी, ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, कट्टीमनी, दिलीप चव्हाण यांच्या उपस्थितीत एक हजार मुलांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

# पं. भिमण्णा जाधव यांना कै. विष्णू दिगंबर पलुस्कर संगीतरत्न पुरस्कार जाहीर

✔ सुराज्य/सोलापूर

अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, नवी मुंबई यांनी कै. विष्णू दिगंबर पलुस्कर संगीतरत्न पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब सुर्यवंशी व सचिव सुधाकर चव्हाण जाहीर केला आहे. ज्या संस्थेसाठी आम्ही परीक्षा घेत आहोत त्या संस्थेच्या मंडळाने आमचा सन्मान केला पाहिजे, तेही संगीताचे देव महादेव, स्वर्गीय विष्णू दिगंबर पलुस्कर जी यांच्या नावाने, माझ्यासाठी यापेक्षा मोठे यश आणि आनंद कोणताच असू शकत नाही. वडिलांच्या आशीर्वादाने आणि तुम्हा सर्वांच्या शुभेच्छाने घडले आहे.

पंडित भिमण्णा जाधव हे सुंद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचे नातू तर वडील पंडित चिदानंद जाधव यांचे चिरंजीव होय. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी युववाणी ऑल इंडिया रेडिओसाठी प्रसारक म्हणून सार्वजनिक पदार्पण केले. सोलापूर सुंदरी हे दुर्मिळ आणि अद्वितीय वाद्य आहे. ज्यांचे पालनपोषण शोधण्याचा आणि सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केवळ जाधव कुटुंबापुरता मर्यादित नाही. पंडित भीमण्णा यांनी या वाद्याचा भारताच्या सीमेपलीकडे गौरव केला आहे. त्यांनी फ्रान्स आणि बेल्जियममध्ये आपली कला सादर करून आपल्या कुटुंबाची स्वप्ने साकार केली आहेत.

इंडियन कौन्सिल ऑफ कल्चरल रिलेशन्स (ICCR) आणि भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने सुंद्री या दुर्मिळ वाद्याचा प्रचार आणि संकलन करण्यासाठी भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने पंडित भिमण्णा जाधव यांचे नाव स्वतंत्रपणे समाविष्ट केले आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने गुरु-शिष्य परंपरा योजना दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर आणि संगीत नाटक अकादमी ऑफ म्युझिक डान्स अँड ड्रामा यांच्या माध्यमातून अनेक



शिष्यांना प्रशिक्षण दिले आहे. आणि २००६ पासून प्रशिक्षण शिक्षक म्हणून कार्यरत आहे.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या ऑल इंडिया रेडिओला सर्वोच्च श्रेणीतील टॉप कलाकार म्हणून मान्यता मिळाली आहे

आकाशवाणी संगीत संमेलनांतर्गत आणि परदेशात आयोजित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत अनेक प्रतिष्ठित संगीत मैफलीत मी भाग घेतला आहे. बालगंधर्व पुरस्कार, शिवरजनी कलागौरव पुरस्कार, सिद्धा पाटील पुरस्कार, कर्नाटक कल्याण कलबुर्गी गौरव सन्मान आकाशवाणी प्रतियोगिता स्पर्धा पुरस्कार, सूरमणी पुरस्कार, पश्चिम बंगाल जदुभट्ट पुरस्कार समाजभूषण पुरस्कार, गुजरात रत्न पुरस्कार, केंद्रीय संगीत नाटक अकादमी उस्ताद बिस्मिल्ला खा पुरस्कार २००७ त्यापैकी उल्लेखनीय आहेत.

उस्ताद अल्लाउद्दीन खाँ संगीत आणि कला प्रदेश अकादमी सांस्कृतिक परिषद भोपाळ उस्ताद लतीफ खान सन्मान २०१९ या दुर्मिळ वाद्याचे जतन आणि संवर्धन करण्याचे माध्यम म्हणून मी सुंद्री सम्राट संगीत महोत्सव आयोजन दुर्मिळ सुंदरी वाद्य कला अकादमी अंतर्गत दरवर्षी संगीत टॅलेंट फेस्टिव्हल गायन वादन नृत्य अशा संगीताच्या विविध क्षेत्रातील युवा प्रतिभा कलाकारांना राज्य युवासम्राट पुरस्कार आणि युवा गंधर्व पुरस्कार प्रदान करीत असतो.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...

### अभिनेत्रीवर बलात्कार, उद्योगपतीवर गुन्हा

**मुंबई** : मुंबईत एका अभिनेत्रींवर बड्या उद्योगपतीने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपी उद्योगपतीने लग्नाचं आमिष दाखवून पीडित अभिनेत्रीचं लैंगिक शोषण केलं आहे. याप्रकरणी एनएम जोशी मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी उद्योगपतीने पीडितेला लग्नाचं आमिष दिलं होतं. त्यानंतर त्याने तिच्यावर अनेकदा बलात्कार केला. याप्रकरणी पीडित अभिनेत्रीने एनएम जोशी मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पीडितेच्या तक्रारीवरून विविध कलमांतर्गत आरोपी उद्योगपतीवर गुन्हा दाखल केला आहे.

### 'मी नथुराम गोडसे' नाटक पुन्हा रंगभूमीवर

**मुंबई** : प्रदीप दळवी लिखित आणि विनय आपटे दिग्दर्शित 'मी नथुराम गोडसे बोलतोय'. सातत्याने झालेला विरोध पत्करूनही या नाटकाचे आजपावेतो हजार प्रयोग झाले आहेत. अनेकदा राजकीय-सामाजिक विरोध पत्करूनही सातत्याने वाटचाल सुरू ठेवलेल्या 'मी नथुराम गोडसे बोलतोय' या नाटकाचे प्रयोग २०१७ साली थांबवण्यात आले होते. आता यंदा ऑक्टोबरमध्ये पुन्हा नव्याने हे नाटक रंगभूमीवर येणार आहे. नव्या नाटकाचे दिग्दर्शन विवेक आपटे करीत असून उदय धुरत हे सादरकर्ते आहेत. माऊली नाट्यसंस्थेतर्फे या नाटकाची निर्मिती करण्यात आले आहे.

### फुकट्या रेल्वे प्रवाशांकडून दीड कोटींचा दंड वसूल

**पुणे** : रेल्वे गाड्यांतून विनातिकिट प्रवास करणाऱ्यांवर रेल्वे प्रशासनाने कारवाईचा दंडुका उगारला आहे. रेल्वेच्या पुणे विभागाने जुलै महिन्यात विनातिकिट प्रवास करणाऱ्या २० हजार १९९ जणांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यांच्याकडून तब्बल १ कोटी ५३ लाख रुपयांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, अनियमित प्रवास करणाऱ्या ८ हजार ४३५ जणांना ४८ लाख ८८ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. तसेच, सामानाची नोंदणी न करता घेऊन जाणाऱ्या १५० जणांकडून १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

### आयकर निरीक्षकाची पावणे पाच लाखांची फसवणूक

**पुणे** : अर्धवेळ काम करून पैसे कमवा, असे आमिष दाखवून नवी मुंबईतील बेलापूर येथील एका व्यक्तीची फसवणूक झाल्याप्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संबंधित व्यक्तीला युट्युबवर व्हिडिओला लाईक, फॉलो करा, त्याचेच पैस दिले जातील असे सांगण्यात आले होते. नवीन छिल्लर असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. नवीन हे आयकर विभागात निरीक्षक पदावर कार्यरत आहेत.

### प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रात झोल करणे आले अंगलट

**लातूर** : आजीच्या शपथपत्राच्या आधारे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र नावावर करण्यासाठी केरबा गोविंदराव शिंदे (वय ४८, रा. चंद्रोदय कॉलनी, प्रकाशनगर, लातूर) या तलाठ्यास लाच स्वीकाताना पकडले असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली. त्यामध्ये तलाठी शिंदे यांनी तक्रारदारांच्या चुलत बहिणींच्या नावावर असलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र आजीच्या शपथपत्राच्या आधारे तक्रारदाराच्या नावाने करून दिल्याचे आढळले. त्याचा मोबदला म्हणून आरोपी शिंदे यांनी सुरुवातीस पाच हजार आणि नंतर दोन हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे समोर आले.

### मुंबईत ३१ कोटी रुपयांची बनावट औषधे

**मुंबई** : शहर आणि उपनगरांतील अनेक औषधांच्या दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणावर बनावट औषधे आणि इंजेक्शन विकली जात आहेत. अन्न व औषध प्रशासनाने नुकत्याच केलेल्या कारवाई अशा अनेक दुकानांवर कारवाई करून गुन्हे दाखल केले आहेत. तब्बल ३१ कोटी रुपयांच्या बनावट औषधे व इंजेक्शन्सची विक्री केल्याचे आढळून आले आहे. अहमदाबाद येथील मेसर्स इन्टास फार्मास्युटिकल्स लिमिटेड या कंपनीचे ह्यूमन नार्मल इम्युनोग्लोब्युलिन फॉर इंट्राव्हिनस आयपी १० टक्के सोल्यूशन या त्यांच्या औषधाचे बनावट औषध बाजारात विकले जात असल्याचे कळवले होते. त्यानुसार औषध नियंत्रकांनी, वडाळा येथील फार्मा केअर स्पेशालिटी येथे छापा टाकला असता तेथे काही बनावट औषधे आढळून आली. ही बनावट औषधे जप्त करण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला दिली आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार; नराधमाला शिक्षा

**बारामती** : बाललैंगिक अत्याचार प्रकरणी सिद्धार्थ दादाराम गायकवाड याला येथील जिल्हा न्यायाधीश जे. एल. गांधी यांनी १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. याच खटल्यात अनुसुचित जाती आणि जमाती प्रतिबंध कायद्यानुसार १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. या खटल्यात फिर्यादी आणि साक्षीदार फितूर झाल्याने त्यांच्यावर सीआरपीसी ३४० प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या प्रकरणी वालचंदनगर पोलीस ठाण्यात पीडित मुलीच्या आईने सिद्धार्थ गायकवाड याच्याविरोधात फिर्याद दाखल केली होती.

### रस्ते कामावरुन राष्ट्रवादीतील दोन गटात हातघाई

**सांगली** : रस्ते कामाच्या विषयावरून महापालिकेत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांच्या समर्थक नगरसेवकामध्ये हातघाईचा प्रसंग उद्भवला. शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या महासभेत हा प्रकार घडल्यानंतर महापौर दिग्विजय सुर्यवंशी यांनी दोन्ही सदस्यांना निलंबित करीत सभागृहाबाहेर जाण्याचे आदेश दिले. महापालिकेची महासभा शुक्रवारी दुपारी महापौर सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. राष्ट्रवादीच्या नगरसेविका संगीता हारगे यांनी रस्ते कामाचे भूसंपादन झालेले नसताना कामाची निविदा कशी काढली असा सवाल उपस्थित केला. या दरम्यान या मुद्द्याला अजितदादा गटाचे सदस्य योगेंद्र थोरात यांनी आ. जयंत पाटील यांचा प्रशासनावर दबाव असल्याने विकास कामात अडथळे येत असल्याचा आक्षेप घेतला. यावरून वादंग माजला.

### एसटी कर्मचारी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसणार

**नागपूर** : शासनात विलिनीकरणाच्या मागणीसाठी एसटी कामगारांनी केलेल्या संपामुळे एसटीची आर्थिक स्थिती ढासळली होती. आता स्थिती रूळावर येत असतानाच कामगारांच्या आर्थिक प्रश्नावर महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेने ११ सप्टेंबरपासून मुंबईत तर १३ सप्टेंबरपासून जिल्हा स्तरावर बेमुदत उपोषणाची घोषणा केली आहे. महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या कोअर कमेटीची बैठक छ. संभाजीनगर येथे झाली. यावेळी कामगारांच्या विविध मागण्यांवर चर्चा करुन आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली.

### राज्यपालांची 'वंदे भारत स्वारी'

**नागपूर** : उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा नागपूर दौरा असल्याने महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस हे नागपूरकडे येण्यास निघाले. राज्यपालांना वंदे भारत एक्सप्रेसने प्रवास करण्याचा मोह आवरता आला नाही. दोन्ही कार्यक्रमांसाठी राज्यपाल रमेश बैस यांना देखील नागपूर गाठायचे होते. ते त्यांच्या रायपूर (छत्तीसगड) मूळगावी होते. येथून ते नागपूरला बिलासपूर-नागपूर वंदे भारत एक्सप्रेसने आले. त्यांनी वंदे भारत एक्सप्रेसने प्रवास करण्याचा आनंद लुटला.

# मी 'नासा'त शास्त्रज्ञ, नोकरी लावतो म्हणून १११ युवकांना ५.३१ कोटींचा चुना

**सुराज्य/नागपूर**

**कोंढाळी दुहेरी हत्याकांडाचा मुख्य सूत्रधार ओमकार महेंद्र तलमले याने मोठी फसवणूक केल्याचे समोर आले आहे. स्वतःला 'नासाचे शास्त्रज्ञ' म्हणवत त्याने तब्बल १११ बेरोजगार तरुणांना नासामध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. तलमलेवर पाच कोटी ३१ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.**




२५ जुलै २०२३ रोजी ओमकारने पैशांचे आमिष दाखवून कोंढाळीजवळ काही गुंडांच्या मदतीने नागपूर शहरातील दोन व्यावसायिकांचे अपहरण केले. त्यानंतर अमरीश देवदत्त गोळे आणि निरलकुमार जयप्रकाश सिंग यांचे खून करून त्यांचे मृतदेह वर्धा जिल्ह्यातील नदीत फेकून दिले.

या प्रकरणी ओमकारला नागपूर ग्रामीण पोलिसांनी अटक केली. त्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. तरुणांनी हिंमत एकवटून पुढे येऊन फसवणुकीची तक्रार नागपूर शहर पोलिसांकडे केली. ओमकारने अनेक तरुणांना बनावट नियुक्तिपत्रेही पाठवली होती. नासामध्ये नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली ही सगळा फसवणूक केल्याचं समोर आलं आहे.

मनीषनगर जयदुर्गा सोसायटी एकदंता अपार्टमेंटमधील रहिवासी अश्विन अरविंद वानखेडे आणि ओमकार तलमले हे एकाच ढोल-ताशा पथकातील असल्याने त्यांची ओळख होती. ओमकारने त्याला सांगितले की तो नासामध्ये ज्युनियर सायंटिस्ट म्हणून काम करतो.

वाडीस्थित रिजनल रिमोट सेन्सिंग सेंटरमध्ये ऑफिस स्टाफ क्लास बी, ऑफिस ॲडमिन, सीनियर ॲडमिनची मोठ्या संख्येने रिक्त पदे आहेत. येथील अधिकाऱ्यांशी आपली चांगली ओळख असल्याचे सांगून त्याला नोकरीचे आमिष दाखवून दोन लाख रुपये बँक ऑफ बडोदाच्या खात्यात जमा करण्यास सांगितले. तुमच्या मित्रांना आणि नातेवाईकांना स्वारस्य असल्यास कळवा असेही त्यांनी सांगितले.

## नोकरी लावून देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, शिक्षण क्षेत्रात खळबळ

**सुराज्य/छ. संभाजीनगर** : वनविभागाच्या परीक्षेत परीक्षार्थी असलेल्या विद्यार्थ्यांकडून तब्बल १० लाख घेऊन परीक्षेत पास करून नोकरी लावून देणाऱ्या टोळीचा सिडको एमआयडीसी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. यातील एका ॲकॅडमी संचालकासह तिघांना बेड्या ठोकल्या आहे. ही कारवाई शुक्रवारी दु. १२ च्या सुमारास करण्यात आली. यामुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अमोल धनराज निचड (वय ३० रा. खंदाळा, ता. आकोट जि. अकोला), संत बाळुमामा ॲकॅडमी संचालक आण्णाजी धनाजी काकडे (वय ३० रा. मुक्काम पिंपळवाडी, पोस्ट वडुज, ता. खटाव, जि. सातारा), अनिल भरत कांबळे (रा. जि. सातारा), संदीप भुतेकर (रा. छ. संभाजीनगर) यांना अटक करण्यात आले आहे. दरम्यान, वनरक्षकपदाच्या परीक्षेत पास करण्याची हमी देऊन परीक्षार्थीकडून १० लाख रुपये घेतले. परीक्षेत पास करून देणाऱ्या टोळीची कुणकुण एमआयडीसी सिडको पोलिसांना लागली होती. पोलिसांनी शुक्रवारी दु. ४ वा. एपीआय कॉर्नरकडून सिडको बसस्थानकाकडे जाणाऱ्या सर्विसरोडवर छापा टाकला. यावेळी रॅकेटमधील आरोपी विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी १० लाख रुपये घेत होते. याप्रकरणी पोलीस अंमलदार देविदास नामदेव काळे यांच्या तक्रारीवरून सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो. नि. गौतम पातारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि राऊत हे पुढील तपास करत आहेत.

## राज्यात आणखी एक राजकीय भूकंप बडा नेता अजितदादांसोबत

**सुराज्य/मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणात वेगवान घडामोडी घडत आहेत. राज्याच्या विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन काल पार पडलं आहे. आज राज्यातील मविआच्या नेत्यांची बैठक सुरु आहे. मविआच्या बैठकीपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाची बैठक आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या बैठकीपूर्वी एक बातमी समोर आली आहे. ते म्हणजे शरद पवार गटातील बडा नेता येत्या काही दिवसांमध्ये अजित पवार गटामध्ये प्रवेश करण्याची शक्यता आहे, अशी बातमी सूत्रांच्या हवाल्यानं एका खाजगी वृत्तवाहिनीनं दिली आहे. त्यामुळं येत्या काळात नेमका कोणता नेता शरद पवारांची साथ सोडणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

राज्यात २ जुलै रोजी राजकीय भूकंप झाला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, आदिती तटकरे, संजय बनसोडे, धर्मरावबाबा आत्राम, अनिल पाटील यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हे देखील अजित पवार यांच्या गटात गेलेले आहेत. अजित पवार यांना एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून संधी देण्यात आलेली आहे. वित्त खातं देखील अजित पवार यांच्या गटाकडे आहे. त्यामुळं बदलत्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटातील काही नेते देखील आगामी काळात अजित पवारांच्या गटात जाणार अशा चर्चा सुरु आहेत.

## राज्याला आणखी तीन वंदे भारत ट्रेन मिळणार

**नागपूर** : भारतीय रेल्वेचा झपाट्याने विस्तार होत आहे. वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांचे नेटवर्क वाढत आहे. तसेच वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेनची मागणी वाढत आहे. देशाचे हृदय म्हटल्या जाणाऱ्या नागपूर शहरातील रेल्वे स्थानकावरून देशाच्या विविध भागातील गाड्या ये-जा करतात. नागपूरहून ये जा करणाऱ्या गाड्यांमध्ये प्रवाशांची गर्दी असते. मात्र सर्वाधिक गर्दी मुंबई, पुणे, हैदराबाद आणि भोपाळमध्ये आहे. नागपूर ते मुंबई जाण्यासाठी अनेक गाड्या आहेत. मात्र, प्रवाशांच्या गर्दी पाहता नागपूर ते पुणे, नागपूर ते हैदराबाद, भोपाळकडे जाणाऱ्या गाड्यांची संख्या कमी



आहे. त्यामुळे नागपूरहून पुणे, हैदराबाद, भोपाळकडे मोठ्या प्रमाणात खासगी बसेस धावतात. हा अभ्यास अहवाल रेल्वे अधिकाऱ्यांनी मंत्रालयाला पाठवला आहे. नागपूर ते पुणे, हैदराबाद आणि भोपाळ या तीन शहरांसाठी वंदे भारत ट्रेन सुरू करण्याची विनंती रेल्वे मंत्रालयाला करण्यात आली आहे.

प्रवाशांची प्रचंड गर्दी पाहता नागपूर ते पुणे, हैदराबाद आणि भोपाळ या मार्गावर वंदे भारत गाड्या लवकरच सुरू होतील असे संकेत आहेत. वंदे भारत एक्स्प्रेस देशभरातील विविध मार्गांवर आणि विशेषतः महाराष्ट्रासह मध्य रेल्वे विभागावर प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. हीच बाब लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालय वेगवेगळ्या मार्गांवर वंदे भारत एक्स्प्रेस चालवण्याची तयारी करत आहे. त्यामुळे नागपूर ते पुणे, हैदराबाद आणि भोपाळ या वंदे भारत एक्स्प्रेस लवकरच सुरू होण्याचे संकेत मिळाले आहेत.

## कोव्हिड सेंटर घोटाळा; पेडणेकरांवर गुन्हा

**सुराज्य/मुंबई**

मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोव्हिड सेंटरमधील बॉडी बॅग खरेदी करताना घोटाळा झाल्याचा आरोप पेडणकरांवर केला जात आहे. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी किशोरी पेडणेकर यांच्यासह मुंबई महापालिकेच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. किशोरी पेडणेकरांवर गुन्हा दाखल झाल्याने उद्धव ठाकरे गटासाठी मोठी धक्का मानला जात आहे.

मुंबईतील आग्रीपाडा पोलिसात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरु आहे. मुंबई महापालिकेने करोना काळात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप करण्यात येत होता. कोव्हिड काळात काढण्यात आलेल्या टेंडर प्रक्रियेत मोठा घोटाळा झाल्याची तक्रार



अंमलबजावणी संचलनालय अर्थात ईडीकडे करण्यात आली होती.

या प्रकरणी किशोरी पेडणेकर यांचीही चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात असतानाच आता किशोरी पेडणेकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईत कोव्हिडमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांना नेण्यासाठी वापरण्यात येणारी बॉडीबॅग २००० रुपयांऐवजी ६ हजार ८०० रुपयांना खरेदी केल्याचं आरोप तत्कालीन विरोधी पक्षाने केला होता. हे कंत्राट तत्कालीन महापौर किशोरी पेडणेकर यांच्या सूचनेनुसार देण्यात आल्याचा आरोप झाला होता.

## ▶ अधिकारी बनली
## ऊसतोड कामगाराच्या मुलीची उत्तुंग भरारी

**सुराज्य/सातारा**

दुष्काळी माण तालुक्यातील शेवरी येथील ऊसतोड कामगाराची व कष्टकरी मेंढपाळाची मुलगी दीपाली शिवाजी राजगे यांची नगररचना सहायक अधिकारी वर्ग -२ पदावर निवड झाली आहे. परीक्षेत ती एनटीसी प्रवर्गातून राज्यात पहिली आली आहे.



यशाचे श्रेय तिने आपल्या कष्टकरी आई-वडिलांना दिले आहे. हे यश मिळवून तिने आई-वडिलांचे व कुटुंबाचे सरकारी नोकरी मिळवण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे.

कायम दुष्काळी भाग असलेल्या माण तालुक्यात आर्थिक संकटाचा सामना करत दीपालीने पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेवरी घेतले. आठवी ते दहावीचे शिक्षण प. म. शिंदे कन्या शाळा दहिवडी, तर अकरावी बारावीचे शिक्षण महात्मा गांधी विद्यालय व जुनिअर कॉलेज दहिवडी येथून विज्ञान शाखेतून पूर्ण केले. त्यानंतर पदवीचे शिक्षण तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व टेक्नोलॉजी वारणानगर (कोल्हापूर) येथून सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर पुणे येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या नगररचना व मूल्यनिर्धान विभागातून रचना सहायक गट ब पदी राज्यातून खुल्या गटातून दहावा क्रमांक व धनगर समाजातून राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे.

दीपाली हिने आयुष्यभर आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी धडपडणाऱ्या कष्टकरी आई-वडिल व कुटुंबाचे सरकारी नोकरी मिळवण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे.

## माफी मागत आव्हाड अज्ञातस्थळी

**सुराज्य/मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटाचे आमदार आणि विधानसभेतील गटनेते जितेंद्र आव्हाड यांचा शनिवारी (५ ऑगस्ट) ६० वा वाढदिवस आहे. परंतु, आपण हा वाढदिवस साजरा करणार नसल्याचं आव्हाड यांनी जाहीर केलं आहे. तसेच ते अज्ञातस्थळी गेले आहेत, त्याचबरोबर त्यांनी त्यांचा फोनही बंद केला आहे. शनिवारी दिवसभरात ते कोणाच्याही संपर्कात नसतील, असंही त्यांनी जाहीर केलं आहे. वाढदिवस साजरा न करता अज्ञातस्थळी जाण्याबद्दल स्वतः आव्हाड यांनी सोशल मीडियावरून माहिती दिली आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास एक ट्वीट केलं आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, 'उद्या ५ ऑगस्ट माझा वाढदिवस लोक अत्यंत उत्साहाने मला भेटायला येतात, शुभेच्छा देतात.

मनापासून आपल्या भावना व्यक्त करतात. ते अत्यंत हृदयस्पर्शी असतं. वर्षभराची ताकद मला तारखेला मिळते. पण मला माफ करा. या ५ तारखेला मी कोणालाही भेटणार नाही आणि वाढदिवसही साजरा करणार नाही.'

# सरकारने उघडली तिजोरी
## प्रत्येक गावात पोहोचणार ब्रॉडबँड, अडीच लाख लोकांना मिळणार रोजगार

**सुराज्य/नवी दिल्ली**

सरकारने आपला खजिना गावांसाठी खुला केला आहे. भारतनेट प्रकल्पांतर्गत ६.४ लाख गावांना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने १.३९ लाख कोटी रुपये मंजूर केले आहेत. सूत्रांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, 'भारतनेट प्रकल्पांतर्गत सध्या १.९४ लाख गावे जोडली गेली असून अडीच वर्षांत उर्वरित गावे जोडली जाण्याची शक्यता आहे.

या योजनेतून अडीच लाख लोकांना रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑप्टिकल फायबर केबल (OFC) चे ३७ लाख मार्ग किलोमीटर (rkm) देशभर पसरलेले आहे, त्यापैकी ७.७ लाख rkm BBNL ने टाकले आहे.

याबाबत आणखी एका सूत्राने सांगितले की, शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशातील सर्व गावांना ऑप्टिकल फायबर आधारित नेक्टिव्हिटी



देण्यासाठी १,३९,५७९ कोटी रुपये मंजूर केले आहेत. लास्ट माईल कनेक्टिव्हिटी बीएसएनएल शाखा भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड व्हिलेज लेव्हल एंटरप्रायझेस (VLEs) च्या सहकार्याने प्रदान करेल. स्थानिक उद्योजकांच्या मदतीने पायलट प्रोजेक्ट यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर फायबर टू द डोअरस्टेप मॉडेलला अंतिम रूप देण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

या प्रकल्पांतर्गत, घरे जोडण्यासाठी लागणारी उपकरणे आणि अतिरिक्त फायबर BBNL द्वारे पुरविले जाते आणि नेटवर्कच्या देखभालीची जबाबदारी स्थानिक उद्योजकांना सोपवण्यात आली आहे. सुमारे ३,८०० उद्योजक सुमारे ६०,००० गावांसाठी पथदर्शी प्रकल्पात सामील होते. या द्वारे ३.५१ लाख ब्रॉडबँड कनेक्शन प्रदान केले जातात, असे एका सूत्राने सांगितले. प्रति कुटुंब सरासरी डेटा वापर दरमहा १७५ गीगाबाइट्स नोंदविला गेला आहे. हा प्रकल्प BBNL आणि VLE यांच्यात ५० टक्के महसूल वाटणीच्या आधारावर सुरू केला जात आहे आणि मासिक ब्रॉडबँड योजना ३९९ रुपयांपासून सुरू होते.

ग्रामीण भागातील लोकांना ब्रॉडबँड कनेक्शनचा खूप फायदा होत आहे. गावातील लोकांना उपचाराच्या चांगल्या सुविधा मिळत असून, मुलांना गावात राहून स्पर्धेची तयारी करता येत आहे.

## इम्रान खान यांना तीन वर्षांची शिक्षा, लाहोरमधून अटक

**कराची** : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान तथा पाकिस्तान तहरिक ए इन्साफ (पीटीआय) पक्षाचे अध्यक्ष इम्रान खान यांच्या अडचणी कमी होण्याची चिन्ह दिसत नाहीत. पाकिस्तानमधील जिल्हा सत्र न्यायालयाने इम्रान खान यांना तीन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. तोशखाना प्रकरणात ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. शिक्षा सुनावल्यानंतर लाहोर येथील जमान पार्क निवासस्थानातून इम्रान खान यांना अटक करण्यात आली आहे.

न्यायालयाने इम्रान खान यांना १ लाख रुपयांचा दंड ठोठावला असून ५ वर्षे निवडणूक लढण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# मुख्य आरोपीचे मारेकरी अजूनही मोकाट ९ कोटी दरोड्याच्या तपासावर प्रश्नचिन्ह

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सांगोला तालुक्यातील वासूदचे रहिवाशी तथा सांगली येथील निलंबित सहाय्यक पोलीस निरीक्षक सूरज चंदनशिवे यांची हत्या झाल्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील वारणानगरमधील ९ कोटींच्या रकमेवर पडलेल्या दरोड्याची कहाणी पुन्हा समोर आली आहे. हे प्रकरण अत्यंत धक्कादायक आहे. या प्रकरणात पोलिसांनीच खाकीवर्दीची शान घालवल्याची खंत कोल्हापूरमधून व्यक्त केली जातेय. या प्रकरणातील मुख्य आरोपी मैनोद्दीन मुल्ला याचाही सूरज यांच्याप्रमाणे खून करण्यात आला. सात महिने झाले मुल्ला याच्या खुनातील आरोपी पोलिसांच्या हाती लागले नाही मग निदान सूरज यांच्या खुनातील मारेकरी पोलिसांना सापडतील काय? असा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सूरज यांच्या मृत्यूमुळे या प्रकरणाच्या तपासाचे काय होणार? अशीही चिंता समोर येते आहे.**

वारणानगर येथील ९ कोटींच्या दरोडा प्रकरणात चंदनशिवे हे संशयित होते. त्यात त्यांना निलंबनाच्या कारवाईल सामोरे जावे लागले होते. पन्हाळा तालुक्यातील वारणानगर येथील शिक्षक कॉलनीत मार्च २०१६ साली झालेल्या नऊ कोटी रुपयांच्या चोरी प्रकरणातील संशयित आणि सांगली येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतून सुरज याचे निलंबन करण्यात आले होते. त्या प्रकरणाचा तपास सांगली व कोल्हापूर येथील स्थानिक पोलिस यंत्रणा करत आहे. सांगलीच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने मिरजेतील बेथेलहेमनगरमध्ये झोपडीवजा घरावर छापा टाकून तेथून तीन कोटींची रोकड जप्त केली होती. याप्रकरणी मैनुद्दीन मुल्ला यास अटक केली होती. चौकशीत त्याने ही रक्कम वारणानगर येथून चोरल्याची कबुली दिली होती. गुन्हे अन्वेषणच्या पथकाने मुल्लाला सोबत घेऊन वारणानगरला छापा टाकून तिथेही कोट्यवधींची रोकड जप्त केली होती. पण या कारवाईवेळी पथकाने सव्वानऊ कोटींची रोकड परस्पर हडप केली होती, असे पोलिसांच्याच तपासात उघड झाले. हा प्रकार तब्बल वर्षभरानंतर उघडकीस आला होता. याप्रकरणी तत्कालीन पोलीस निरीक्षक विश्वनाथ घनवट, सहाय्यक निरीक्षक सूरज चंदनशिवे, सहाय्यक फौजदार शरद कुरळपकर, हवालदार शंकर पाटील, दीपक पाटील, कुलदीप कांबळे, रवींद्र पाटील यांच्याविरुद्ध कोडोली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल झालेल्या ७ पैकी ६ पोलिसांचे तत्कालिन सांगली जिल्हा पोलीस प्रमुख दत्तात्रय शिंदे यांनी निलंबन केले होते. वर्षभरापूर्वी सूरज यांचे निलंबन मागे घेऊन त्यांची सांगली पोलीस मुख्यालयात कंट्रोल विभागात बदली करण्यात आली होती मात्र, दोन महिन्यांपूर्वी त्यांना पोलीस दलातून बडतर्फ करण्यात आले होते.

**पीएसआय खून प्रकरण**



**आपबिती**

## काय आहे वारणा दरोडा प्रकरण?

मार्च २०१६ मध्ये वारणानगर येथील एका शिक्षण संस्थेच्या इमारतीमधून सुमारे नऊ कोटी १८ लाखांची रक्कम लंपास झाली होती. यावेळी मैनुद्दिन मुल्ला (रा. सांगली) हा काही दिवस याच शिक्षण संस्थेत वाहनचालक म्हणून काम करत होता. संस्थेच्या एका इमारतीत मोठी रक्कम असल्याची माहिती त्याला होती. त्याने रात्रीच्या वेळी काही रक्कम लंपास केली. त्यातून सांगलीतील दोन पोलिसांना त्याने महागड्या दुचाकी भेट दिल्या होत्या म्हणे.

## सूरज यांच्यावर असा झाला आरोप

कोल्हापूर पोलिसांच्या तपासात हा प्रकार उघडकीस आल्यानंतर मुल्ला याच्यासह सांगली एलसीबीकडील तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिवे आणि अन्य सहकाऱ्यांवर वारणानगरात जाऊन दोनदा मोठ्या रकमेवर डल्ला मारणे आणि सांगली, कोल्हापुरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांपासून हा प्रकार लपवून ठेवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला.त्यानंतर या प्रकरणी चंदनशिवे आणि सात पोलिसांवर गुन्हा दाखल झाला होता.

## मुख्य आरोपीचे मारेकरी मोकाट...

या प्रकरणातील मुख्य आरोपी मैनुद्दीन मुल्लाचा सुद्धा २९ जानेवारी २०२३ रोजी सांगलीत खून झाला होता.सात महिने झाले मुल्लाचे मारेकरी पोलिसांच्या हाती लागले नाहीत. मुख्य आरोपीनंतर एका पोलीस अधिकाऱ्याचाही खून झाला. मुख्य आरोपीचे मारेकरी अद्याप सापडले नाहीत.तेव्हा निदान सूरज यांच्या खुनातील आरोपी पोलिसांच्या हाती लागतील काय? अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.सांगोला पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून ठिकठिकाणी पथके पाठवली आहेत.त्यांच्या तरी प्रयत्नांना यश येईल काय? याकडे सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

# लाँग मार्चसाठी प्रथमेश कोठे यांच्या नेतृत्वाखाली समाजबांधव दिल्लीकडे रवाना



सोलापूर : ७ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त दिल्ली येथील लाल किल्ल्यापासून राजघाटापर्यंत लाँग मार्च निघणार असून यासाठी अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघमचे प्रेसिडेंट तथा माजी नगरसेवक प्रथमेश महेश कोठे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी सकाळी सोलापूर रेल्वे स्थानक येथून कार्यकर्त्यांसह दिल्लीच्या लाँग मार्च साठी रवाना झाले. सोलापूर रेल्वे स्थानकावर श्री मार्कंडेय महामुनींचा जयघोष करीत समाज बांधव दिल्लीकडे रवाना झाले. यावेळी सचिव सूर्यकांत जिंदम, जे.एम. संघटनेचे संस्थापक सिद्धेश्वर कमटम, पद्मशाली विभाग संघटनेचे माजी प्रेसिडेंट अंबादास अमृतम, युवक संघटना माजी प्रेसिडेंट गोविंद चिंता, माजी सचिव योगेश मार्गम, छत्रपती औशेट्टी, नितीन मार्गम, दीपक राजुल, आदींसह समाज बांधव उपस्थित होते दरम्यान दिल्लीसाठी रवाना झालेल्या बांधवांचे सत्कार आचारी म्याकल यांनी केले.

# जिल्हाधिकाऱ्यांनी शहीद किसन माने यांच्या कुटुंबियांचा केला सन्मान

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात महसूल सप्ताह अंतर्गत सैनिक हो तुमच्यासाठी हा उपक्रम अंर्तगत जिल्ह्यातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान तसेच अडचणी सोडविण्यात येत आहेत. शनिवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंगळवेढा तालुक्यातील येड्राव येथील शहीद किसन माने यांच्या निवासस्थानी गेले व तिथे त्यांनी शहीद माने यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

माने कुटुंबीयांशी मनमोकळेपणाने संवाद साधत त्यांच्या परिवारा समवेत चहा आणि पोहेचा अस्वाद घेतला. शनिवारी जिल्हाधिकाऱ्यांनी शहीद माने यांच्या निवासस्थानी सुशांत माने, सचिन माने यांचे व त्यांच्या पत्नी तसेच त्यांची छोटी मुले या सर्वांचा सन्मान केला. प्रांताधिकारी समींदर यांनी ही शहीद कुटुंबाचा तालुक्याच्या वतीने सत्कार केला. स्मारक स्वतःच्या शेतामध्ये आणि ते झाडाच्या खाली सावलीमध्ये असल्याने जिल्हाधिकाऱ्यांना हे स्थळ आवडले. शहीद किसन माने हे कारगिल युध्दानंतर एका मिशनवर असताना झालेल्या अपघातात ते शहीद झाले होते. जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी माने कुटुंबीयांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. चहा घेतलापोहे देखिल खाले. जिल्हाधिकारी आपल्या निवासस्थानी आल्याने माने कुटुंबीय आनंदात होते.



महसूल प्रशासन घरोघरी जाऊन लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत आहे. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, प्रांताधिकारी आप्पासाहेब समिंदर, तहसीलदार मदन जाधव, निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे, मंडल अधिकारी शामला कुंभार, तलाठी सारिका कोंढारे यांची उपस्थिती होती.

# आई वडिलांना न सांभाळणाऱ्यांची आता वारस नोंदणी होणार नाही

**सरपंच वनिता सुरवसे यांचा मासिक सभेत निर्णय**

सुराज्य/अक्कलकोट

गोगांव येथे ग्रामपंचायत मासिक सभेत सरपंच वनिता सुरवसे यांच्याकडुन मांडण्यात आलेल्या संकल्पनेतून गावात आई वडिलांना न सांभाळणाऱ्या मुलांच्या वारसासाठी भविष्यात ग्रामपंचायत कडून कुठलाच दाखला व सही देण्यात येणार नाही असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या ठरावाचे सर्वत्र कौतूक होत आहे.


गोगांव ग्रामपंचायतीच्यावतीने जिल्हा परिषद शाळा पासून ग्राम पंचायत पर्यंत दोन्ही बाजूला सहायक गट विकास अधिकारी उमेश कांटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सरपंच वनिता सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, केंद्र प्रमुख बा ना चव्हाण, कृषी विस्तार अधिकारी पाटरुट, ग्रामसेवक विक्रम घाटे, ग्राम पंचायत सदस्य लक्ष्मण बिराजदार, शरणप्पा कलशेट्टी, मुख्याध्यापक दयानंद चोळे, कृषी सहायक सिद्धाराम शिरगापुरे, डॉ लिंगराज नडगेरी आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना उमेश काटे म्हणाले की, सरपंच वनिता सुरवसे यांनी आई वडील यांना न सांभाळणाऱ्या मुलांचे भविष्यात वारस नोंदी साठी कुठल्याही प्रकारचे ग्रामपंचायत दाखला न देण्याचा ऐतिहासिक निर्णय आहे, हे कौतुकास्पद आहे. यावेळी झाडाच्या सुरक्षा साठी गावातील सेवा निवृत्त पोलिस फकिरप्पा बनसोडे, परमेश्वर गायकवाड, डॉ लिंगराज नडगेरी, पोस्ट मास्तर भूषण साठे यांनी सुरक्षा जाळी देण्याचे घोषणा केले. यावेळी अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, तेजाबाई गुरव, बाळप्पा जावळे, विजयकुमार गायकवाड, फूडलीक वाघमारे, कारभारी सर, आदी उपस्थित होते.



# जिल्ह्यात ४ ठिकाणी पोलीस ठाणे वाढवण्याची गरज : कृष्ण प्रकाश

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील जे तालुके मोठे आहेत, अशा जिल्ह्यातील चार ठिकाणी पोलिस ठाणे वाढवण्याची गरज आहे. याबाबतचा अहवाल आपण पाठवणार असल्याचे मत राज्याचे अपर पोलिस महासंचालक कृष्ण प्रकाश यांनी व्यक्त केले.



ग्रामीण जिल्हा पोलिस दलाच्या वार्षिक तपासणीसाठी अपर पोलिस महासंचालक प्रकाश हे तीन दिवसांपासून सोलापूर दौऱ्यावर आले आहेत. यावेळी त्यांनी मत व्यक्त केले. यावेळी पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलिस अधीक्षक हिंमत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कृष्ण प्रकाश पुढे म्हणाले, जिल्ह्यातील क्राइम रिकव्हरी प्रमाण जास्त आहे. तसेच काही भाग सोडल्यास जिल्ह्यात सर्वत्र शांतता आहे. यात अक्कलकोट येथे नेहमी छोट्या- मोठ्या घटना घडत असतात. तसेच दुसऱ्या राज्याच्या तुलनेत आपल्या राज्यात पोलिसिंग चांगले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# तडवळ भागातील उडीद, मूग पीक धोक्यात

**तालुक्यात १६ जुलैपासून सतत सुरु असलेल्या पावसाचा परिणाम**

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील तडवळ भागात यंदा मे महिन्यात चांगला पाऊस झाल्याने बहुसंख्य शेतकरी उडीद, मुगाची पेरणी केली होती. सध्या हे पीक काढणीस आला असतानाच तडवळ भागात पंधरा दिवस भीज पाऊस लागल्याने उडीद, मुग पीक संकटात सापडले आहे.

तालुक्यात १६ जुलैपासून सतत पाऊस सुरु आहे.या भीज पावसामुळे शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटात सापडला आहे. उडीद व मुगाच्या शेंगा पूर्णपणे वाळलेली असतानाच पाऊसाला सुरुवात झाल्याने प्रचंड प्रमाणात उडीद व मुग पिकाची नुकसान झाले आहे. अजून ही तालुक्यात अधूनमधून भीजपाऊस सुरुच आहे. तडवळ भागातील तडवळ, खानापूर, म्हैसलगी, गुड्डेवाडी आदी भागांत उडीद व मुगाची पेरणी मोठ्याप्रमाणात झाली होती. सध्या सततच्या पावसामुळे उडीद, मूगाच्या शेंगांना झाडावरच मोड येताना दिसून आला आहे. हाता-तोंडाशी आलेला घास वरुणराजाने पुन्हा एकदा हिरावून घेतल्याने तडवळ भागातील शेतकरी हतबल झाला आहे. नुकसान झालेल्या पिकांची पंचनामा करून नूकसान भरपाई देण्याची मागणी तडवळ भागातील खानापूरचे शेतकरी रविकांत कुरे यांच्या सह आदी शेतकरी करताना दिसतात.



# विडी उद्योग वाचवा, कामगार जगवा जनजागृती रथयात्रा

सुराज्य/सोलापूर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने उद्योग वाचवा - कामगार जगवा जनजागृती संघर्ष रथयात्रा अभियान ९ ऑगस्टपासून सुरू करण्यात येत असल्याची माहिती प्रदेश अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कामगार व त्यांच्या कुटुंबीयांची रोजीरोटी वाचविण्यासाठी विडी उद्योग वाचवा - कामगार जगवा ही रथयात्रा काढण्यात येत आहे. विविध संकटातून विडी कामगार, उद्योजक जात असताना याकडे मात्र केंद्र सरकारचे दुर्लक्ष होत आहे, असे कारमपुरी यांनी सांगितले. दत्तनगर, दाजी गणपती जवळ पहिली सभा होणार असल्याचेही कारमपुरी यांनी सांगितले. यावेळी परिषदेस रेखा आडकी, साक्षी आळगी, प्रियंका कणकी, गुरुनाथ कोळी, विठ्ठल बुऱ्हाडकर, गोवर्धन मुदगल आदी उपस्थित होते.

# विष्णुपंत कोठे यांच्या जयंती सप्ताहानिमित्त आरोग्य तपासणी

सुराज्य/सोलापूर

जुनी मिल आवारातील संभाजीराव शिंदे विद्या मंदिरात संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी स्व. विष्णुपंत कोठे यांच्या ८६ व्या जयंती उत्सव सप्ताह निमित्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी, दंत व रक्त तपासणी रक्तगट चाचणी, धनुर्वात लसीकरण व इतर तपासण्यांचे शिबिर घेण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन संस्थेच्या संचालिका डॉ. राधिका चिलका, देगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या व्यवस्थापक डॉ.सोनाली महिंद्रकर, बालरोगतज्ञ डॉ.अण्णासाहेब लोखंडे, डॉ.मीना काशेट्टी, डॉ. दत्तात्रय सर्जे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. माधुरी थिटे, डॉ. गोपाळ कामतकर, डॉ. अजिंक्य अग्निहोत्री, डॉ. स्वप्निल गुंड, डॉ.प्रगती चव्हाण, साजिद शेख, मुख्याध्यापिका राजश्री नारायणकर, मुख्याध्यापक नागेश कुमार काटकर बालक मंदिर च्या मुख्याध्यापिका वैशाली सुरवसे व शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष रेखा मसाळ आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. काशेट्टी, डॉ.अण्णासाहेब लोखंडे, डॉ.सोनाली महिंद्रकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या शिबिरात १००० हून अधिक विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हा कार्यक्रम पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय केगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र देगाव, भारतीय दंत परिषद व शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. दत्तात्रय सर्जे, डॉ गोपाळ कामतकर व साजिद शेख यांच्या सहकार्यातून पार पडला. सूत्रसंचालन बिभीषण सिरसट यांनी तर आभार प्राध्यापक देविदास उत्पात यांनी केले.



# पत्नीला त्रास देत नांदवण्यास नकार; सहा जणांवर गुन्हा

सोलापूर : पत्नीला त्रास देत, तिला नांदवण्यास नकार दिल्याप्रकरणी सहा जणांवर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत प्रियंका विजय मिठ्ठा (वय-२५, रा. भवानी पेठ, घोंगडे वस्ती) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी प्रियंका यांचे विजय मिठ्ठा यांच्यासोबत २०२० मध्ये विवाह झाला होता. विवाहानंतर पती व त्यांच्या कुटुंबीय हे फिर्यादी यांना त्रास देऊ लागले. त्यांच्याशी वारंवार वादविवाद घालत, भांडण करू लागले. शिवाय शारीरिक व मानसिक त्रास देऊन जाचहाट केला, अशा आशयाची फिर्याद प्रियंका यांनी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती विजय मिठ्ठा, सासू भारती मिठ्ठा, सासरे तुकाराम मिठ्ठा, नणंद अरुणा यनगुडी, कामाक्षी आडकी, दीर दिनेश मिठ्ठा ( रा. बजरंग नगर, सुरत गुजरात) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास दुधाळे करत आहेत.

# जलजीवन व स्वच्छ भारत मिशन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा : सीईओ आव्हाळे

सुराज्य/सोलापूर

ओडिएफ प्लस गाव करणे साठी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन ती कामे वेळेत पुर्ण करा. जलजीवन मिशन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा. जलजीवन मिशनच्या कामात दिरंगाई केल्यास काळ्या यादीत टाकू असा इशारा झेडपीच्या सीईओ मनिषा आव्हाळे यांनी दिला.



जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जल जीवन मिशन ते प्रकल्प संचालक अमोल जाधव, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भुवैज्ञानिक डॉ. संजय कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांचे सह गटविकास अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता, विस्तार अधिकारी पंचायत व आरोग्य, बीआरसी व सीआरसी, आयएसए, पीएमसी, टीयूव्ही या सल्लागार संस्थेचे समन्वयक व कर्मचारी उपस्थित होते. जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नल से जल या बाबी महत्वाच्या आहेत. ३३० गावात ग्रामसभा घेऊन पुर्ण करावेत. या साठी ठराव घ्या. व्हीडीओ घेऊन अपलोड करावे लागणार आहे. ग्रामसेवक यांचेशी संवाद साधा. काम पुर्णत्वाचा दाखला घ्या. अशा सुचना सिईओ मनिषा आव्हाळे यांनी दिल्या.

**हरघर जलसाठी विशेष ग्रामसभा घ्या :** जिल्ह्यात ३३० ग्रामपंचायती मध्ये १०० टक्के नळ कनेक्शन देणेत आले आहे. ज्या गावात अद्याप नळ कनेक्शन बाकी आहे अशी गावे पुर्ण करा. विशेष ग्रामसभा घेऊन दोन मिनिटाचा व्हीडीओ व ग्रामसभा ठराव घेऊन ऑनलाईन नोंदणी करा. पाणी गुणवत्ते मध्ये काम कमी असलेले अक्कलकोट, मंगळवेढा तालुक्यांना नोटिसा देणेचे सुचना सिईओ मनिषा आव्हाळे यांनी दिल्या.

**तर काळ्या यादीत टाकणार :** कामे वेळेत पूर्ण करा. जे ठेकेदार काम वेळेत पुर्ण करणार नाहीत त्यांना काळ्या यादीत टाकणार आहेत. कुठे अडचणी येतात ते मांडा. किती दिवसात कामे पुर्ण करणार याचा लेखी अहवाल द्या, थर्ड पार्टी निरीक्षण साठी जास्त मनुष्यबळ लावा. वेळेत काम न करणारे ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणेचे सुचना शासनाने दिले आहेत, असेही आव्हाळे यांनी सांगितले.

# माने यांच्या वाढदिवसानिमित्त भागाईवाडीत विविध उपक्रम

सुराज्य/सोलापूर

माजी आमदार दिलीपराव माने यांच्या वाढदिवसानिमित्त भागाईवाडीतील अण्णाभाऊ साठे सभागृहात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते सोसायटी संचालक लहूआबा घोडके होते.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य विजय घोडके, पोलीस पाटील सजित पाटील, तंटामुक्त अध्यक्ष बब्रुवाहन घोडके, अंकुश आप्पा घोडके, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रताप पाटील, लता घोडके, दीपश्री चौधरी, भारत घोडके, अशोक घोडके, सोसायटी संचालक विनोद हावळे, अनंत हावळे, मुख्याध्यापक आदिल सय्यद, बाळासाहेब शेंडगे आदी उपस्थित होते. यावेळी भागाईवाडी-शेरेवाडी येथील शाळा व अंगणवाडी मधील विद्यार्थ्यांना किट्स,शालेय साहित्याचे वाटप उपस्थित मान्यवराचे हस्ते करण्यात आले. माने यांची ओळख न्यायासाठी सदैव पुढे असणारा धाडसी नेता म्हणून आहे. त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारातून सोलापूर शहर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यात कार्यकर्ते, सामाजिक, विधायक उपक्रमातून वाढदिवस साजरा करीत असल्याचे कौठाळी विकास सोसायटीचे संचालक लहू घोडके यांनी सांगितले.

सरपंच परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्षा तथा माजी सरपंच कविता घोडके-पाटील यांनी भागाईवाडी-शेरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या गुणवत्तेमुळेच गावचा शैक्षणिक व विकासात्मक लौकिक असून या ज्ञान मंदिरात आवश्यक सुविधा देण्याच्या मी आजवर प्रयत्न केला व पुढेही करेन असे सांगितले. यावेळी जयसिंग चौधरी, सुरज पाटील पद्मिनी घोडके, निर्मला घोडके, भाग्यश्री घोडके, विजया घोडके, अर्चना चौधरी, चित्रा जाधव, जयश्री मोरे, मालन मोरे, भानुदास घोडके, प्रशांत घोडके आदीसह उपशिक्षक तात्यासो कचरे, मदतनीस मोहिनी घोडके, गावातील नागरिक महिला, युवक, विद्यार्थी उपस्थित होते.

